
# माणूस

शनिवार । ६ मे १९७८

७५ पैसे


चरणसिंगांच्या राजीनाम्याने 'त्या' जबाबदारीचे भान आले तरी बरेच काही साध्य होईल.

( पृष्ठ : ३ )



# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक एकूणपन्नास
६ मे १९७८
मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


## सप्रेम नमस्कार

'माणूस' १५ एप्रिल १९७८ च्या अंकातील पृष्ठ क्र. १४ वर आपण म्हटले आहे.

..."सुंगधित ते आदरावे। बकुल वा प्राजक्त' हे येथील ज्ञानेश्वरमहाराजच म्हणतात असे नाही"...

ही ओवी ज्ञानेश्वरांची नाही. ही ओवी 'वाङ्‌मयशोभा' मासिकाच्या पृष्ठ क्र. १ वर पुढीलप्रमाणे नेहमी मुद्रित केलेली असते.

" जें गवसलें ते दावावें।
जे सुचलें तें सांगावें।
सुगंधित तें आदरावें।
बकुल वा प्राजक्त।"

मला असे वाचलेले स्मरते, की ही ओवी 'वाङ्‌मयशोभा' मासिकाचे संपादक श्री. मनोहर महादेव केळकर यांना स्फुरलेली असून तशी त्यांनी नोंद काही महिन्यांपूर्वीच्या अंकाच्या संपादकीयात केली होती,

तेव्हा या ओवीचे कर्ते ज्ञानेश्वर नसून श्री. म. म. केळकर आहेत.

**वसंत देवधर**

१६ एप्रिल — डोंबिवली

संपादक-माणूस यांसी,

श्री. वसंत देवधर यांचे (वरील) पत्र व 'माणूस'चा १५ एप्रिलचा अंक मिळाला. त्यामुळे स्मरणशक्तीला बराच ताण देऊनही भागेना. मग शोध सुरू केला. तेव्हा मे १९६७ म्हणजे 'वाङ्‌मयशोभे' च्या २९ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाच्या पहिल्या पानावर,

"जे गवसले ते दावावे।
जे सुचले ते सांगावे।
सुगंधित ते आदरावे।
बकुल वा प्राजक्त।"

ही स्वकृत ओवी सापडली, पण ती तेव्हा स्फुरलेली नव्हती. मग शोध घेताघेता, १९५४ साली मी प्रसिद्ध केलेल्या 'झुंजुमुंजु' या योगिनी जोगळेकर यांच्या कथासंग्रहाच्या वेष्टनाच्या मागे मी वाङ्‌मय-शोभेची जाहिरात केली आहे, त्यात प्रथम ही ओवी करून घातलेली आढळली. शक्यता अशी आहे की, त्या पुस्तकावरील मुखपृष्ठ चित्रकार फडणीस यांनी रेखाटले आहे. त्यात एक परकरी मुलगी झाडावरून पडणारी प्राजक्ताची फुले गोळा करीत आहे, असे दाखविले आहे. त्यावरून कदाचित् ती कल्पना सुचली असावी. त्या ओवीत तिसऱ्या ओळीत 'जें गंधित' असे शब्द आहेत ते बदलून पुढे 'सुगंधित' हा शब्द घातला आहे. ही जाहिरात त्यानंतरच्या काही प्रकाशनांवरही छापलेली आहे.

माझ्या संपादकीय धडपडीची पूर्वी न कळलेली पण नंतर आकलन झालेली दिशा या ओवीत अत्यंत सुयोग्य रीतीने व्यक्त होते, असे मला वाटते.

साक्षेपाने विचारणा केल्याबद्दल तुमचा आणि माझे श्रेय मला देणाऱ्या देवधरांचा मी आभारी आहे. ही ओवी ज्ञानेश्वरीतील नसली तरी त्यातली वाटावी-असे पूर्वीही घडले आहे. यावरून श्रीज्ञानदेवांच्या उसळणाऱ्या प्रतिभासागरातील एखादा शितोडा अभावितपणे माझ्या वाट्यास आला याची धन्यता वाटते, पण मी अजून ज्ञानेश्वरी वाचलेली नाही.

कळावे,

**म. म. केळकर**

ता.क.—माझे मित्र कै. शांताराम आठवले ह्यांच्या 'आधी बीज एकले' या अभंगाबद्दल आणि सोपानदेव चौधरी यांच्या 'आली कुठुनशी कानी, टाळमृदुंगाची धून' या अभंगाबद्दल त्या दोघांना असेच श्रेय मिळाले होते. ते दोघे नामवंत कवी, पण मी कवी नाही एवढाच फरक.

म. म. केळकर

बरेच दिवस आपणास पत्र लिहावे असे मनात होते. तो योग आज येत आहे.

आणीबाणीनंतर 'माणूस' मध्ये जास्तीत जास्त राजकीय लिखाण येऊ लागले. कारण

अर्थातच सहाजिक. काही काळपर्यंत हे लिखाण येणेही जरूर होते, पण आता माणूस ' over political ' वाटते.

' माणूस 'चा पूर्वीचा Matter and form pattern हा Socio political cultural विषयांना सारखेंच स्थान देणारा होता. म्हणून तो जास्त Balanced होता. अर्थात व्यवसाय म्हणून तो Pattern कितपत योग्य होता हे आपणच सांगू शकाल; पण मला तरी आजच्या ' माणूस 'ची जुन्या ' माणूस 'शी तुलना करवत नाही. (old is gold !)

' माणूस 'चं रूपडं तुम्ही एवढं का बदललंत ? की माणूस family groop मध्ये फाटाफूट झाली ? पूर्वी रवींद्र पिंगे, भावे, तारा पंडित, शांताराम पारपिल्लेवार. किती अनेक, ' माणूस 'च्या ओंजळी भरून गेले. आणि आता ? आताच काय झाले ? Serials का बंद केल्या ? ' माणूस 'चा कवितेवर रोष का ?

भविष्यबंदी योग्यच आहे. तुम्ही माणूस-ला राजकीय जाचातून सोडवाच. आम्हाला जुना ' माणूस ' हवाय.

१६ एप्रिल **किशोर दीक्षित, ठाणे**

# ' राष्ट्र ' म्हणजे तरी काय ?

□ १५ एप्रिलचा माणूस – त्यातील सदाशिव पेठकरांचे पत्र वाचले. प्रतिक्रिया न देणे अशक्यच वाटल्यामुळे लिहीत आहे.

पेठकरांनी एकात्मतेवर होणाऱ्या आघातां-बद्दल चिंता व्यक्त केली आहे. प्रश्न महत्त्वाचा आहे, चिंता वाटण्यासारखा आहे; परंतु केवळ राष्ट्रीय एकात्मतेवर आघात होत आहे, म्हणून चिंता व्यक्त केली, एकात्मता या विषयावर भाषणे केली आणि काही शिबिरे, परिसंवाद जरी आयोजित केले आणि यातून एकात्मता वाढीस लागेल असे जर आपण मानणार असू, तर आणी-बाणीपासून आपण काहीच शिकलो नाही असे खेदाने म्हणावे लागेल.

आणीबाणीत वृत्तपत्रस्वातंत्र्याचा लोप झाला, म्हणून मी आणि माझ्यासारखे असंख्य लोक हळहळले. सगळ्या लोकांना आमच्यासारखे वाटत कसे नाही याचेच आश्चर्य वाटे. जनताराज्य येऊन एक वर्षाने आमच्या राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि काय आश्चर्य ! बदनाम बाईला आदिवासींनी, शहरी झोपडपट्टयांनी, ग्रामीण गरिबांनी भरघोस पाठिंबा दिला. सप्तस्वातंत्र्यांचा लोप करणाऱ्या बाईला यांनी पाठिंबा का दिला ?

याचा थोडासा उलगडा मला पुण्यातल्या वृत्तपत्रसृष्टीबद्दल जो प्रत्यक्ष अनुभव आला, त्यावरून झाला. पुण्यातील, आणीबाणी-विरुद्ध लढलेल्या एका साप्ताहिकाच्या आदरणीय संपादकाने मला स्वच्छ शब्दांत सांगितले की, ' आम्ही जे नियतकालिक चालवतो ते आमची मते प्रसृत करण्यासाठी. आमच्या मतांवरील प्रतिक्रिया प्रसिद्ध करण्याचे आम्हावर बंधन आहे असे आम्ही मानीत नाही. ' म्हणजे वृत्तपत्रे खुली व्यास-पीठे नसतात. कोणत्या ना कोणत्या गटाची मते प्रसृत करण्यासाठीच ती असतात आणि त्यामुळे त्या गटांच्या हितसंबंधांना जपणारीच ती असू शकतात. हे एवढे लिहावयाचे कारण म्हणजे वृत्तपत्रांविषयी माझे काही गैरसमज होते, जे ' वृत्तपत्रे ही लोकशाही आधारस्तंभ आहेत ' या कोठे तरी वाचलेल्या वचनामुळे दृढ झाले होते आणि माझ्याप्रमाणेच अनेकांचे असण्याचा संभव आहे. इतके विवेचन झाल्यावर आजच्या आपल्या वृत्तपत्र-सृष्टीकडे आपण बघू. आमची मोठ्यात मोठी वृत्तपत्रे, नियतकालिके कोणाची आहेत ? कोणाच्या बातम्या, कोणाच्या बाजूने देतात ? ' माणूस 'मध्येच प्रसिद्ध झालेल्या रवींद्र सरोवर या कल्पित घटने-वरील निरनिराळ्या वृत्तपत्रांनी दिलेल्या बातम्या जरा आठवून पहाव्यात.

पुन्हा या देशातील निम्म्याहून अधिक लोक दारिद्र्यरेषेखाली जगतात. त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नात तंटा कोणाशी होतो, संघर्ष कोणाबरोबर करावा लागतो आणि मग या संघर्षाच्याबद्दल वृत्त-पत्रे काय लिहितात हेदेखील बघावे. माझे गैरसमज दूर करणारे संपादक मला म्हणाले की, ' अशा लोकांनी स्वतःची वृत्तपत्रे चालवावीत ! ' दारिद्र्यरेषेखालील लोक वृत्तपत्रे चालवू शकतात. त्यांच्यापेक्षा सुस्थितीत असणाऱ्या शहरी कामगारांना-देखील ते सोपे जात नाही.

हे एक उदाहरण झाले आणि उदाहरण द्यायचे कारण म्हणजे आपल्या अपेक्षांना काही पाया असावा ही जाणीव यावी हा आहे. सप्तस्वातंत्र्यांची, देशाच्या एकात्मतेची जी स्वप्ने आपण आज पहातो तीच स्वप्ने जर आपल्या बहुसंख्य बांधवांनी पाहिली तरच ती प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे, याचे भान राहिले पाहिजे. यानंतर आमची स्वप्ने प्रत्यक्षात यावीत या दिशेने कोणाचे प्रयत्न चालले आहेत, आमच्या स्वप्नांच्या इमल्यांना आधारभूत होणारे बळकट जोते बांधण्याचे काम कोण करीत आहे हे पहावे लागेल.

आता राष्ट्र आणि राष्ट्रभक्ती वगैरे माझ्या मताने अतिशय सवंगपणे आणि उथळपणे वापरण्यात येणाऱ्या वाक्प्रयोगां-बद्दल–

या शब्दांबद्दल आणि कल्पनांबद्दल साधारणपणे सुशिक्षित लोकांच्या भावना फार नाजूक असतात. याचा वापर फार कौशल्याने करून घेतला जातो. एखाद्या चावट बाईने रस्त्यात उभे राहून ' मेल्याने मला धक्का मारला हो ' म्हणून बोंब ठोकावी आणि येणाऱ्या–जाणाऱ्यांनी आरोपीला धरून ठोकावे असाच प्रकार राष्ट्रद्रोही वगैरे शब्द वापरून कौशल्याने करण्यात येतो. आठवून पहावे जरा पंढरीनाथ रानड्यांचे आणि त्यांना झालेल्या मारहाणीचे प्रकरण.

राष्ट्र म्हणजे तरी काय ? केवळ एक भूभाग म्हणजे राष्ट्र ! त्या भूभागाची सलगता म्हणजेच काय राष्ट्राची एकात्मता ?

राष्ट्राला भूभागाची आवश्यकता तर आहेच; परंतु राष्ट्रासाठी आवश्यक असणारी त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकात्म अशा मानवांचा समूह.

आज आम्ही एकात्म आहोत ? आम्ही भारतीय आज खरोखर एका मोठ्या कुटुंबा-

सारखे राहू शकतो?

स्वदेशी मिलच्या मालकांच्या सगळ्या गिरण्या सरकारने ताब्यात घेतल्याची बातमी काही दिवसांपूर्वीच आली आहे. याच मालकांनी पगार द्यावा म्हणून घेराओ करणाऱ्या कामगारांवर अमानुष गोळीबार झाला. आज एवढे कामगार बळी पडल्यावर सरकारचे लक्ष तिकडे वेधले गेले आहे. त्याआधी केलेल्या कामाचे पैसे मागणाऱ्या कामगारांना गोळ्या घालण्यात आल्या. मालकांवर काय कारवाई झाली? गिरण्यांची नुकसानभरपाई दिली किंवा नाही हे मात्र वृत्तपत्रांमधील बातमीवरून समजू शकले नाही.

कानपूर तर दूर राहिले. इथे पुण्यात गेले दीड वर्ष काय चालले आहे? डेव्हिड ब्राउनच्या धरणे धरून बसलेल्या कामगारांवर लाठीहल्ला का झाला? संघटना करणे हा कामगारांचा कायदेशीर हक्क असताना S. K. F. च्या संघटनेच्या नेत्यांना काय म्हणून काढून टाकण्यात आले? आणि त्यांच्यासाठी संपावर असणाऱ्या कामगारांना झालेली अमानुष मारहाण!

कामगार सोडून देऊ. ५–६ वर्षांपूर्वी वैरागला अन्नाकरिता मोर्चा आणलेल्या, भुकेलेल्या, आमच्या दुष्काळग्रस्त बांधवांवर गोळीबार का झाला? दामाजीच्या भूमीतले, दामाजीच्या गोष्टी ऐकत वाढलेले आम्ही लोक. आम्ही जगापेक्षा वेगळेच नाही का?

पण मग हे गोळीबार, लाठीहल्ले प्रत्येक वेळी दडपले गेलेल्यांच्यावरच का होतात? आम्ही एकात्म आहोत?

साताऱ्याच्या पाणीपुरवठ्याविषयी 'सकाळ' किंवा 'केसरीत' नक्की आठवत नाही, एक लेख आला होता. डोंगरावरून पाइपलाइन टाकण्याचे काम चालू आहे आणि त्या डोंगराचा काही भाग इतका धोकादायक आहे की तेथे काम करणाऱ्या मजुरांचे म्हणे विमे उतरविले आहेत. केवढा मोठेपणा त्या कॉन्ट्रॅक्टरचा!

विमा उतरविला म्हणजे संपली जबाबदारी! कोणी जर मेलाच तर त्याच्या बायकापोरांच्या तोंडावर फेकले १०–१५ हजार रु. की आपण मोकळे!

खरोखर कॉन्ट्रॅक्टरने केवढी 'रिस्क' घेतली आहे!

जास्त पैसे खर्च झाले तरी बेहत्तर; परंतु अशा धोकादायक परिस्थितीत आम्ही कोणालाच काम करू देणार नाही असा विचार का नाही मनात येत? माणसाची किंमत सतत पैशाने करायचा प्रयत्न!

पुरंदरचा शेंद्या बुरूज उभा करण्यासाठी म्हणे एका महाराने आपला मुलगा व सून बळी देऊ दिले होते. राजीखुषीने दिलें होते. आता ते मजूर नाही का त्या धोकादायक डोंगरावर राजीखुषीने काम करीत?

आमच्या मातृभूमीची फाळणी केली. आमच्या सिंधू नदीला आम्ही मुकलो म्हणून टाहो फोडणारे, डाव्या कम्युनिस्टांच्या फुटीरपणामुळे चिंताग्रस्त झालेले, आमच्या कित्येक खेड्यांमधील बांधवांना चारचार मैलांवरून पाणी आणावे लागते आणि त्यामधील कित्येकांना पाण्यासाठी भीक मागावी लागते याने का नाही व्यथित होत? अहो, एकात्मतेच्या रोजच्या व्यवहारात जाणवणाऱ्या या प्रभावाने त्यांची छाताडे दुःखाने विदीर्ण कशी होत नाहीत बरे?

कोण राष्ट्रवादी, कोण फुटीर आणि कोण राष्ट्रद्रोही? संस्थानिकांचे तनखे रद्द केले म्हणून दुःखी होणारे, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या लोकोपयोगी कामामुळे चिंतातुर होणारे देशभक्त? वर्णव्यवस्थेचे जमेल तेव्हा, जमेल तसे समर्थन करणारे आणि त्या प्राचीन काळाकडे आम्हाला नेऊ पाहणारे राष्ट्रभक्त आणि एकात्मतावादी? ज्यांचे प्रत्यक्ष कार्य म्हणजे शिवजयंतीच्या मिरवणुका आणि मराठी बेकारांना तामीळ बेकारांविरुद्ध उठविणं आणि मराठी कामगारांना अन्य कामगारांविरुद्ध उठविणे हेच आहे. ते ज्वलंत राष्ट्रभक्त?

आणि आदिवासींना, शेतमजुरांना अन्यायाविरुद्ध लढायला शिकवणारे, कामगारांमध्ये काम करता करता आपली आयुष्ये वेचलेले, या आमच्या गोरगरीब पिळल्या जाणाऱ्या जनतेचे ज्यांनी नेतृत्व केले आणि त्यासाठी लाठ्या-गोळ्या खाल्ल्या ते देशद्रोही? ते मार्क्सचे, लेनिनचे आणि माओचे नाव घेतात म्हणून? मग हिटलरच्या भक्तांचे काय? जोसेफ मॅझिनीला गुरुस्थानी मानणारे तात्याराव सावरकर कोण? मिल स्पेन्सरच्या प्रभावाखालचे आगरकर आणि त्याहून पुढे जायचे तर इंग्रजी राज्याचे कौतुक करणारे म. फुले कोण?

आता प्रत्यक्ष स्वायत्ततेच्या मागणीबाबत महाराष्ट्राचे रोजगार हमी विधेयक केंद्राने अजून मंजूर केलें नाही. महाराष्ट्रामधील बहुसंख्य लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी दृष्ट लागावी अशा एकोप्याने जे विधेयक मंजूर केले ते केंद्राने मंजूर केले नाही. कारण? मोरारजीभाईंनी म्हणे 'डोल' देणे आवडत नाही. माझ्या गावात एक मजूर आहे. त्याने सांगितले की, मजुरीपेक्षा भीक मागून जास्त पैसे मिळतात! केवढी श्रमाची किंमत व प्रतिष्ठा!

'स्रोत' पुस्तकाच्या परीक्षणासंबंधाने: श्रीमान गुणे यांनी संघाच्या बुद्धिनिष्ठेबद्दल लिहिताना नानाराव पाळकरांनी सांगितलेला 'बौद्धिकाचा' दाखला दिला आहे.

मार्क्सवाद हे भ्रान्त तत्त्वज्ञान आहे याबद्दल निःसंशय असलेले डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी ५-६ वर्षांपूर्वी 'वसंत'मध्ये संघावर बंदी घालावी का, या विषयावर लेख लिहिला होता. त्यात त्यांनी असे लिहिले होते की, बौद्धिकांची नेहमीची तऱ्हा सोडून त्यांनी जेव्हा काही नवीन शिकविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना विरोध झाला. या प्रयत्नात ते अपयशी ठरले.

डॉ. हेडगेवार यांच्या चरित्रातील बाबाराव सावरकरांचे उल्लेख कापल्याची दुसरी गोष्ट मला आठवली. श्री. गोपाळ गोडसे

पृष्ठ २१ वर

राजधानी दिल्ली

प्रतिनिधी

# चरणसिंगांचा राजीनामा म्हणजे अंतर्गत असंतोषाचा स्फोट

पहिल्या वर्षाचा शेवटचा दिवस जनता पक्षाच्या दृष्टीने अत्यंत खळबळजनक ठरला. दुसऱ्या वर्षात पदार्पण करताना, हा पक्ष दुभंगतो की काय, अशी चिंता वाटण्याजोगी परिस्थिती ३० एप्रिलला निर्माण झालेली होती. ज्या हरयानाच्या प्रश्नावरून चरणसिंग यांनी केंद्रीय कार्यकारिणी आणि संसदीय मंडळ यांचा राजीनामा धाडून दिला, तो प्रश्न मिटविण्यात यश आले तरी जनता पक्षाला या आघातातून सावरायला बराच वेळ लागणार आहे.

मोरारजी देसाई, चरणसिंग आणि जगजीवनराम या तिघा नेत्यांमध्ये बरेच मतभेद निर्माण झालेले आहेत आणि त्यामुळे मंत्रिमंडळाच्या कामकाजातून एकजिनसीपणा नाहीसा झालेला आहे अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या की, 'हा केवळ पत्रकारांच्या कल्पनेचा खेळ आहे,' असे उडवाउडवीचे उत्तर देऊन हे मतभेद झाकून ठेवण्याचा खटाटोप केला जात असे. चरणसिंगांच्या राजीनामा-पत्रामुळे त्या मतभेदांचे स्वरूप तर स्पष्ट झालेच, शिवाय या मतभेदांची व्याप्ती किती खोलवर गेलेली आहे, हेही कळून आले. म्हणून चरणसिंगांच्या राजीनाम्यापेक्षाही त्यांनी ज्या कारणाकरिता राजीनामा द्यावयाचे ठरवले ती गोष्ट जनता पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीने गंभीर ठरते.

हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री रामनरेश यादव यांना बडतर्फ करण्याच्या कारवाया जनता पक्षातील एक गट सतत करीत असून, त्या गटाच्या या उचापतींना आवर घालण्याची आपण पंतप्रधान मोरारजी देसाई यांना अनेक वेळा विनंती करूनही त्या बाबतीत काहीही झालेले नाही, यासंबंधीचा आपला संताप आणि निषेध व्यक्त करण्यासाठी चरणसिंग यांनी पक्ष-यंत्रणेतील दोन अत्यंत महत्त्वाच्या समित्यांचा आपण राजीनामा देत आहोत असे त्या पत्रात म्हटले आहे. चरणसिंग सध्या हृदयविकाराने आजारी असून, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत उपचार घेत आहेत. डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिलेला आहे. त्यांची भेट घेण्याची कोणालाही परवानगी दिली जात नाही. प्रकृती एवढी नाजूक झालेली असतानाही, चरणसिंगांना मतभेदांचा समग्र तपशील कथन करणारे पत्र लिहावेसे वाटले यावरून देवीलाल आणि रामनरेश यादव यांच्या बाबतीतील कारवाया थांबल्या नाहीत तर आपण मंत्रिमंडळातून आणि पक्षातूनही बाहेर पडू हेच त्यांना सुचवायचे आहे. म्हणून मोरारजी देसाई यांनी त्यांची तातडीने भेट घेऊन, ते संकल्पित पुढचे पाऊल न उचलण्यासंबंधी प्रयत्न केले,

## देवीलाल यांचा बहिष्कार

हरयानामध्ये देवीलाल यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यापासूनच भजनलाल, चांदराम प्रभृतींकडून मुख्यमंत्रि-पदावरून देवीलाल यांची उचलबांगडी व्हावी या दृष्टीने प्रयत्न चालू झालेले होते. आपल्याला पुरेसा पाठिंबा लाभलेला आहे अशी भजनलाल प्रभृतींची खात्री पटल्यानंतर त्यांनी, बहुमताचा आपल्याला पाठिंबा आहे किंवा नाही हे देवीलालनी हरयाना विधानसभा जनता पक्षाची बैठक बोलावून अजमावून पाहिले पाहिजे या मागणीचा पुरस्कार सुरू केला. संसदीय मंडळापुढे हा प्रश्न जेव्हा विचारासाठी आला तेव्हा मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांनी तो हाताळावा असे ठरले आणि त्याप्रमाणे गेल्या शनिवारी मोरारजींच्या बंगल्यावर हरयानामधील जनतापक्षीय आमदारांना निमंत्रित करण्यात आले. देवीलाल ह्या बैठकीसाठी दिल्लीला आले होते; परंतु बैठकीत सहभागी व्हायचे नाही असे त्यांनी ठरविले. म्हणून त्यांनी ही बैठक दिल्लीला न भरविता चंडीगड येथे बोलाविली जावी अशी मागणी करून शनिवारी दुपारी भरलेल्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यामुळे ही बैठक रविवार सकाळपर्यंत पुढे ढकलण्यात आली. या मधल्या काळामध्ये, देवीलाल यांनीच मुख्यमंत्रिपदावर रहावे; परंतु त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात थोडेसे बदल करावेत असा समझोता सुचवून हरयानाबाबतचा पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा प्रयत्न कितपत यशस्वी होईल हे सांगणे कठीण आहे. कारण देवीलाल यांचे समर्थक आणि विरोधक यांची संख्या समसमान असून दोन्ही गट माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. देवीलाल यांच्याबाबत जे काही घडले त्यावरून बोध घेऊन रामनरेश यादव यांच्याविरुद्धच्या कारवाया काही काळ स्थगित ठेवण्यात येतील; परंतु या अशा तात्पुरत्या उपायांमुळे जनता पक्षाला आपली ढासळती एकजूट आणि ओसरते सामर्थ्य कसे सावरता येणार आहे हा खरा प्रश्न आहे.

चरणसिंगांच्या राजिनामा–पत्राने त्यावरच प्रकाशझोत टाकला आहे.

ते म्हणतात की देवीलाल यांच्यामध्ये काही उणीवा असतीलही. ते चांगले प्रशासक नसतीलही; परंतु त्यांच्या प्रामाणिकपणासंबंधी कोणालाही शंका घेता येणार नाही. त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी आणीबाणीत खूप त्रास सहन केला आहे. असे हे देवीला॰

मुख्यमंत्रिपदावरून उडावेत यासाठी प्रयत्न करणारे लोक कोण आहेत ? ते आहेत बलवंतराय तायल, मूलचंद जैन आणि भजनलाल. ही मंडळी जनता पक्षात असली तरी त्यांची घसट आहे ती अत्याचार आणि उन्मत्तपणा यांनी ज्यांची राजवट कलंकित झाली होती त्या बन्सीलाल यांच्याशी. हरियानामधील जनता पक्षात दुफळी पडावी याकरिता इंदिरा गांधींकडून बन्सीलाल यांच्यामार्फत या तिघांना चिथावणी दिली आहे असे आपण वारंवार निदर्शनास आणून दिलेले असतानाही त्यांना समज देण्याबाबत पंतप्रधान मोरारजी देसाई आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर गप्प बसले असा स्पष्ट आरोप चरणसिंगांनी केलेला आहे. केंद्रीय नौकानयनमंत्री चांदराम यांचा वावर जगजीवनराम यांच्या गोटात होत असतो. भजनलाल यांच्याशी चांदरामही संपर्क साधून असतात. त्यामुळे चरणसिंगांनी आपल्या राजीनामा-पत्रामध्ये ज्याप्रमाणे मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांच्यासंबंधीची नाराजी प्रकट केली आहे तसाच त्यांना जगजीवनरामांचा हरयानामधील हस्तक्षेप अनुचित वाटतो हेही सूचित झाले आहे.

## बिजू पटनाईक यांची मध्यस्थी

चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्यातील वादामध्ये मोरारजीभाई कोणाचीच बाजू घेत नाहीत. त्यामुळे चरणसिंगांना त्यांच्यावर पक्षपाताचा आरोप करता येत नाही; परंतु मोरारजीभाईंची अलिप्तता त्यांना दुबळेपणाची वाटते. हरयानाच्या राजकारणामध्ये जगजीवनरामांचा तसा फारसा पुढाकार नसतो. बिहार आणि उत्तरप्रदेश येथील राजकारणावर आपले वर्चस्व असावे असा ते मात्र प्रयत्न करीत असतात आणि त्यातूनच कर्पुरी ठाकूर आणि रामनरेश यादव यांना बदनाम करण्याच्या मोहिमा रामानंद तिवारी आणि रामधन यांच्यामार्फत जगजीवनराम चालवीत असतात. देवीलाल यांच्या बडतर्फीचा क्षण जवळ आलेला आहे हे जाणवल्यानंतर आता आपण स्वस्थ बसणे योग्य होणार नाही हे ओळखून चरणसिंगांनी गेल्या शुक्रवारी रात्री आपला राजीनामा पक्षाचे सरचिटणीस मधु लिमये यांच्याकडे धाडून दिला. ते पत्र घेऊन राजनारायण लिमये यांच्याकडे आले; परंतु आपण त्या पत्रात काय लिहिले आहे याचा चरणसिंगांनी राजनारायण यांनाही सुगावा लागू दिला नव्हता. चरणसिंगांचे ते पत्र वाचताच मधू लिमये हादरले आणि लगेच त्यांनी बिजू पटनाईक यांच्याकडे धाव घेतली. कारण जगजीवनराम आणि चरणसिंग यांच्यात दिलजमाई घडवून आणण्यासाठी अलीकडे बिजूबाबूंनी पुढाकार घेतला होता. बिजूभाईंनी त्या दोघांना आपल्या घरी भोजनासाठी बोलाविले होते आणि त्यांना मनमोकळी बातचीत करता यावी म्हणून भोजन सुरू झाल्यावर बिजूभाई थोडा वेळ बाहेर जाऊन आले होते. मधू लिमये चरणसिंग यांचे पत्र घेऊन आले तेव्हाही बिजू पटनाईक यांच्याकडे भोजनासाठी दोन निमंत्रित व्यक्ती आलेल्या होत्या. त्या म्हणजे देवीलाल आणि चांदराम.

दुसऱ्या दिवशी होणाऱ्या हरयाना विधानसभेतील जनता पक्षीय सदस्यांच्या बैठकीत भजनलाल प्रभृतींनी तडजोडीचा पवित्रा घ्यावा अशी बिजू पटनाईक यांनी चांदराम यांना विनंती केली; परंतु ती मान्य करायची त्यांची तयारी नव्हती. एवढ्यात चरणसिंगांच्या राजीनाम्याचा बाँब घेऊन मधु लिमये तेथे येताच चांदराम यांचा पहिला ताठरपणा थोडासा ओसरला. तरीही देवीलाल यांना बडतर्फ करण्याची चालून आलेली संधी दवडायची त्यांची तयारी नव्हती. देवीलाल यांना चरणसिंगांच्या पत्रामुळे भलतेच बळ प्राप्त झाले; म्हणून तर त्यांनी ही बैठक चंडीगडला घ्यावी असा आग्रह धरला. मोरारजीभाईंच्या निवासस्थानी देवीलाल आले ते बिजू पटनाईक आणि चांदराम यांच्या समवेत; परंतु बैठक सुरू होण्यापूर्वीच देवीलाल निघून गेले. त्या वेळी देवीलाल यांचे समर्थक आणि विरोधक यांच्यात परस्परविरोधी घोषणांचे वाग्युद्ध भरास आले होते. ते सारे वातावरण पाहून शनिवारची बैठक स्थगित करून ती रविवारी सकाळी भरविण्याचे ठरले.

## आता लक्ष जगजीवनरामांकडे

देवीलाल यांनी मुख्यमंत्रिपदावर रहावे असे प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे चरणसिंग आपला राजीनामा मागे घेतील अशी अपेक्षा आहे. कारण हा वाद आणखी चिघळत ठेवणे त्यांच्याही हिताचे नाही. परंतु त्याचबरोबर जनता पक्षातील पूर्वीचे काँग्रेसजन आणि समाजवादी भारतीय लोक दलाविरुद्ध जो पवित्रा घेत आहेत तो आपण यापुढे मुळीच सहन करणार नाही या आपल्या निर्धारात ते बदलही करणार नाहीत. चरणसिंग यांनी ही अशी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर जगजीवनराम आपली व्यूहरचना कशी काय आखतात हा आता कुतूहलाचा विषय झालेला आहे. उद्या त्यांनी जर चरणसिंगांप्रमाणेच राजीनाम्याचा त्रागा करण्याचे ठरविले तर त्यांची समजूत काढताना त्यांना कोणते आश्वासन द्यायचे याचा मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांच्यापुढे प्रश्नच उभा राहणार आहे.

एखादा नेता कितीही मातबर असला तरी त्याच्या निर्गमनामुळे पक्षाला अर्धांगवायूचा झटका येईल असे मानण्याचे कारण नाही. परंतु त्याचा पक्षत्याग पक्षाच्या सामर्थ्यावर निश्चितच विपरीत परिणाम करून जातो. जनता पक्षाच्या बाबतीत हा धोका अधिकच आहे. कारण एक तर चार भिन्न पक्षांच्या विलिनीकरणातून हा पक्ष जन्माला आलेला असल्यामुळे त्याच्या घटकांमध्ये म्हणावे असे सामरस्य निर्माण झालेले नाही. दुसरे असे की हिंदीभाषिक प्रदेशाची कक्षा ओलांडून अन्य प्रदेशात पायरोवा करणे अद्याप त्या पक्षाला जमलेले नाही. अशा परिस्थितीत जर जनता पक्षाच्या निर्मितीला कारणीभूत झालेल्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एखादा दूर गेला तर या पक्षाच्या कक्षा रुंदावण्याऐवजी आकरसत जातील. असे घडले आणि त्याबाबतीत जनता पक्षाच्या एखाद्या गटाला सोयरसुतक वाटणार नसले तरी ज्या मतदारांनी अत्यंत विश्वासाने या नवजात पक्षाला सत्तेवर नेऊन बसविले त्यांच्या श्रद्धेशी जनता पक्षाच्या नेतृत्वाला प्रतारणा करता येणार नाही. ती एक नैतिक जबाबदारी आहे आणि सत्ता सांभाळण्यापेक्षाही ती अधिक महत्त्वाची आहे. चरणसिंगांच्या राजीनाम्याने त्या जबाबदारीचे भान आले तरी बरेच काही साध्य होईल. अन्यथा इंदिरा गांधींच्या शापवाणीचे भविष्यवाणीत रूपान्तर व्हायला फारसा अवधी लागणार नाही.

□

# जनतापक्ष

## एकजुटीऐवजी संघर्ष वाढले

वा. दा. रानडे

जनता पक्षाच्या औपचारिक स्थापनेस एक मेस एक वर्ष पुरे झाले. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्साहाने पहिला वाढदिवस साजरा केला; पण एक वर्षानंतर पक्षातील निरनिराळ्या घटकांत एकजूट आणि एकजीव निर्माण होण्याऐवजी अंतर्गत संघर्ष वाढत असल्याचेच चित्र दिसत आहे. पश्चिम बंगालमध्ये पक्षात फूट पडून श्री. प्रफुल्ल चंद्रसेन यांनी वेगळा पक्ष काढला. महाराष्ट्रात चव्हाण काँग्रेससंबंधी स्वीकारावयाच्या धोरणावर मतभेद निर्माण झाले आहेत. चरणसिंगांनी पक्षाच्या कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजीनामा दिला. हरियाना आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री चरणसिंगांच्या भालोद गटाचे आहेत. त्यांचे नेतृत्व बदलण्याची मागणी पक्षातले इतर घटक करीत आहेत. गेले चार-पाच महिने तेथे हा संघर्ष धुमसत आहे. गेल्या १७ जानेवारीस हरियाना जनता विधिमंडळ पक्षाची गुप्त बैठक होऊन मुख्यमंत्री देवीलाल यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला; पण हा ठराव योग्य पद्धतीने पास झाला नाही, अशी बंडखोर गटाने तक्रार केली. संघर्ष चालूच राहिला. आपल्यामागे बहुमत असल्याचा दावा बंडखोर गटाने पुन्हा केला आणि आपल्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून घेण्यासाठी विधिमंडळ पक्षाची बैठक देवीलाल यांनी २९ एप्रिलला बोलवावी असे ठरले. या बैठकीच्या दिवशीच चरणसिंग यांनी कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजिनामा पाठविला हे सूचक होते. पक्षबैठकीस देवीलाल गटाचे सभासद उपस्थित नव्हते. पक्षाचे सरचिटणीस हेगडे यांनी बैठक रविवारी सकाळी अकरा वाजेपर्यंत स्थगित केली.

हरियानातील नेतेपदाचा प्रश्न हरियानापुरताच मर्यादित राहिला नाही. देवीलाल यांना नेतेपदावरून दूर केले जाऊ नये यासाठी दडपण आणणे हा चरणसिंगांच्या राजिनाम्याचा उद्देश होता हे उघड आहे; पण त्यांनी आपल्या पत्रात उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार पक्षाच्या शिस्तबद्ध बांधणीच्या दृष्टीने करायला हवा. पक्षाचे नेते बेशिस्तीला चिथावणी देत आहेत हा चरणसिंग यांचा मुख्य आरोप आहे. देवीलाल यांचे विरोधक बन्सीलाल यांच्याशी हातमिळवणी करीत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. देवीलाल यांनीही हा आरोप पूर्वीच केलेला आहे. हा आरोप खरा आहे की, विरोधकांना बदनाम करून आपली प्रतिमा उजळ करण्यासाठी देवीलाल यांनी केलेला प्रचार आहे याची शहानिशा व्हायला हवी. कर्नाल लोकसभा पोटनिवडणुकीत जनताउमेदवाराचा पराभव झाला तर आपल्याला आनंद होईल असे उद्गार देवीलाल विरोधी गटाचे श्री. बळवंतराव बांदल व इतर काही नेत्यांनी काढले होते. तरी त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नाही असे चरणसिंगांनी म्हटले आहे. या चार आमदारांना नेता-निवडण्याच्या सभेत मतदानाचा हक्क मिळता कामा नये अशी मागणी देवीलाल यांनीही आपल्या पत्रात केली आहे. त्याला हेगडे यांनी असे उत्तर दिले की, शिस्तभंग कारवाईसंबंधात त्यांच्याकडून स्पष्टीकरणे मागविण्यात आली आहेत. ती आल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत नेतानिवडसभेत त्यांचा मतदानाचा हक्क हिरावून घेता येणार नाही. तांत्रिकदृष्ट्या हे उत्तर बरोबर आहे; पण याबाबत अधिक त्वरित कारवाई करून नेतानिवडसभेपूर्वी निर्णय घेणे अशक्यच होते का असा प्रश्न मनात उभा राहतो. मनात आणले तर नेते त्वरित कारवाई करू शकतात याचे एक उदाहरण चरणसिंगांनी दिले आहे. पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध निवडणूक लढवून बेशिस्त वर्तन केल्याबद्दल काही सभासदांना पक्षात प्रवेश नाकारण्यात आला. या दुटप्पीपणाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे; पण या दुटप्पीपणापासून देवीलाल यांचा गट तरी कोठे अलिप्त आहे ? तीन अपक्ष आमदारांना जनता विधिमंडळ पक्षात दाखल करून घेण्यात आले. नेता-निवडसभेत उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क त्यांना देण्यात यावा अशी देवीलाल यांची मागणी होती. या निर्णयास विधिमंडळ पक्षाची आणि केंद्रीय संसदीय मंडळाची मान्यता मिळायला हवी असे हेगडे यांनी या मागणीस दिलेले उत्तर पक्षशिस्तीच्या दृष्टीने योग्यच होते.

हरियानाच्या नेतेपदाबाबत निर्णय घेतला जाण्यापूर्वी हा लेख मी लिहिलेला आहे. तो निर्णय काहीही लागो, कदाचित तात्पुरती तडजोड होऊन पेचप्रसंग टळेलही, पण मूळ दुखणे काही अशा तात्पुरत्या उपायांनी दूर होणार नाही. आपल्या पूर्वीच्या पक्षांचे अस्तित्व विसरून एक पक्ष म्हणून आपण खऱ्या अर्थाने काम करणार का नाही याचे आपल्या कृतीतून जनतानेते काय उत्तर देतात यावर त्या पक्षाचे भवितव्य ठरणार आहे.

चरणसिंगांनी इतर नेत्यांवर आरोप केले, पण त्यांचा गट व जनसंघ तरी गटबाजीपासून कोठे अलिप्त होते? जून १९७७ मधील विधानसभा निवडणुकांनंतर या दोन गटांनी युती करून उत्तरेकडच्या राज्यातील मुख्यमंत्रिपदांचे आपसात वाटप केले. इतर घटकांत तेव्हापासून नाराजी आहे. या गटबाजीतून पक्ष डोके वर काढू शकला नाही तर काँग्रेससारखीच त्याची गत होईल.

काँग्रेसबाबत काय धोरण स्वीकारावयाचे या बाबतीतही चरणसिंग आणि इतर नेत्यांत मतभेद आहेत. हा प्रश्न मुख्यतः महाराष्ट्राच्या संदर्भात उपस्थित झाला. महाराष्ट्रातील सध्याचे दोन काँग्रेसपक्षांच्या आघाडीचे सरकार पाडण्यासाठी शरद पवार गटाला आपल्या बाजूला वळवून जनता पाठिंब्याने चव्हाण काँग्रेसचे किंवा जनता-काँग्रेस आघाडीचे सरकार स्थापता येईल का या दृष्टीने हालचाली झाल्या. मधु लिमये यांनी यशवंतराव चव्हाणांशी बोलणी केली. शरद पवारांनीही जनता-नेत्यांशी विचारविनिमय केला. या आघाडीबाबवत काँग्रेसपेक्षा जनता-नेत्यांनाच घाई झालेली दिसली. त्यातही केंद्रीय नेत्यांचा याबाबतीत अधिक पुढाकार दिसला. प्रांतिक नेत्यांना याची कल्पनाही नव्हती वास्तविक यावावत त्यांचा प्रथम सल्ला घ्यावयास हवा होता. काँग्रेसप्रमाणेच जनता पक्षातही वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतले जातात असा समज त्यामुळे दृढ झाला. काँग्रेसशी आघाडी

करण्याची आवश्यकता काय ? महाराष्ट्रात आणखी काही काळ सत्ता हाती आली नाही म्हणून बिघडले कोठे ? जनता पक्षाने दोन काँग्रेसमध्ये भेद करण्याचे काही कारण नाही. आणीबाणीला सबंध काँग्रेसने पाठिंबा दिला होता व ती राबविली होती हे विसरून चालणार नाही. दुसरे असे की, दोन काँग्रेस पक्षात इंदिरा काँग्रेसलाच अधिक पाठिंबा आहे हे १९७८ च्या विधानसभा-निवडणुकीवरून स्पष्ट झाले आहे. नष्टप्राय झालेल्या चव्हाण काँग्रेसला जनता पक्षाने जीवदान कशासाठी द्यावयाचे ? चव्हाण—पवारांना अशा सहकार्याची आवश्यकता थोडीही वाटत असल्याचे दिसत नाही. महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसशी संगत सोडावयास ते तयार नाहीत. मग काँग्रेसशी आघाडीची ही एकतर्फी घाई कशासाठी ? इंदिरा काँग्रेसशी एकट्याच्या बळावर मुकाबला करायला जनता पक्ष समर्थ नाही अशी त्या पक्षाच्या दुबळेपणाची प्रतिमा त्यातून निर्माण होते ती पक्षाचे बळ वाढविण्यास पोषक खास नाही. या प्रयत्नातून निष्पन्न काहीच झालेले नाही. पंधरा मेस काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय परिषदेत विलिनीकरण व एकीकरणाच्या प्रश्नावर निर्णय व्हावयाचा आहे, पण त्यात स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्याच्या ठरावापलीकडे काही होईल असे वाटत नाही. जनता पक्षाने एक वर्षानंतर तरी शिस्तबद्ध पक्षबांधणीच्या कार्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. □

---

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ पंतनगरचे हत्याकांड— एक लाजिरवाणा अत्याचार

ब्रिटिश जमान्यात जालियनवालाबागेमध्ये झालेल्या हत्याकांडाची आठवण करून देणारे, साऱ्या देशात खळबळ माजविणारे आणि उत्तर प्रदेश सरकारला काही प्रतिष्ठा असलीच तर तिची धूळधाण उडविणारे पंतनगरचे भयावह हत्याकांड म्हणजे काळ्या अक्षरात ज्याची कायम नोंद ठेवावी लागेल असा एक लाजिरवाणा प्रकार आहे ! पंतनगरमध्ये नेमके काय झाले ? याचा तपशील दिल्लीच्या लिंक या साप्ताहिकाने, तसाच मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियाने विस्ताराने पुरविला आहे. कामगार असंघटित रहावा आणि तो असंघटित राहिल्यामुळे व्यवस्थापनाला त्याची सतत पिळवणूक करता यावी असा विचार एखाद्या खाष्ट उद्योगपतीने केला तर ते समजण्यासारखे आहे. तथापी एखाद्या विद्यापीठाच्या कुलगुरूने हा असला नापाक विचार मनी बाळगावा, इतकेच नव्हे तर त्याचा पाठपुरावा करून कामगारांची वर्षोगणती पिळवणूक करावी ही खरोखरच शरमेची गोष्ट आहे आणि असा हा कामगार संघटित झाला आणि संघशक्तीच्या द्वारे त्याने आपल्या न्याय्य हक्कांची मागणी केली तर उत्तर काय मिळते ? तर...बेछूट—निर्दय गोळीबार ! एका विद्यापीठाच्या आवारात घडलेल्या दुर्दैवी कहाणीची ही अशी पार्श्वभूमी आहे.

आजूबाजूच्या विद्यापीठांमधून दंगेधोपे, संप, विद्यार्थ्यांच्या चळवळी, उपकुलगुरूंचे राजीनामे यांसारखे प्रकार सरसहा चालू असताना उत्तर प्रदेशातील पंतनगरचे व्यवस्थापन चोख होते. विद्यापीठाच्या आवारातील वातावरण बाह्यात्कारी तरी शांत होते. विद्यापीठात कधी पोलिस बोलावण्याची गरजच भासली नाही. कधी पदवीदानप्रसंगी अथवा सभा-संमेलनाच्या निमित्ताने पोलिस आले तर गर्दीचे नियंत्रण करणे आणि वाहतूकव्यवस्था सांभाळणे एवढेच त्यांचे काम. याच पंतनगरने कर्मचाऱ्यांच्या संतप्त निदर्शनाचे आणि पोलिसांच्या संतापजनक गोळिबाराचे भेसूर दृश्य तेरा एप्रिल १९७८ या एका दिवशी पाहिले—अनुभविले. या गोळिबाराचे वृत्त जसे देशभर पसरले तसा सारा देश खवळून उठला. असल्या गोळिबारामध्ये खरी आकडेवारी कधीच हाती लागत नाही. सरकारी आकडेवारीप्रमाणे १२ लोक मृत्युमुखी पडले तर ३३ निदर्शक जखमी झाले. पंतनगरपरिसरातील विश्वासार्ह व्यक्ती, जागेला प्रत्यक्ष भेट देऊन आलेले वार्ताहर आणि निदर्शनामध्ये ज्यांनी भाग घेतला होता त्यांचे प्रतिनिधी यांच्या मते गोळिबारात बळी पडलेल्यांची संख्या किमान पन्नासच्या घरात आहे, तर जखमींचा आकडा १५० च्या आसपास आहे. सरकारने दिलेल्या वृत्ताप्रमाणे पोलिसांनी एकूण २०८ फैरी झाडल्या. ही आकडेवारी मान्य केली तर मृतांची संख्या किमान पन्नास धरायला कोणतीही हरकत नाही. आता प्रश्न असा निर्माण होतो की, पोलिसांनी २०८ फैरी झाडायला असे काय मोठे रामायण घडले होते ? हजार—बाराशे निःशस्त्र निदर्शक घोषणा दे-देऊन दमले असते. फार तर चार—दोन पत्थर त्यांनी फेकले असते. असे त्यांनी काय केले होते की, गोळीबार अपरिहार्य अथवा समर्थनीय ठरावा ? वार्ताहरांचे निःपक्षपाती निर्णय असे स्पष्ट सांगतात की, जमाव हिंसक होता, त्यांनी दगड-विटांचा मारा सुरू केला होता. या आरोपातही तथ्य नाही आणि समजा, वादासाठी असे गृहीत धरले की, जमाव आक्रमक होता तरीही परिस्थिती आटोक्यात ठेवणे एवढेच जर मर्यादित उद्दिष्ट असते तर अशा गोळिबाराची आवश्यकता नव्हती.

या संघर्षाची सुरुवात शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांपासून झाली. नंतर त्यात विद्यापीठाचे कर्मचारी, विद्यार्थी आणि थोडाफार शिक्षकवर्गही सहभागी झाला. सुरक्षित जागी राहून पुस्तकी चर्चा करणारा पांढरपेशा बुद्धिवादीवर्ग सर्वसाधारण शेतमजुराच्या बाजूने उभा राहिल्याने चळवळीलाही चांगलीच धार आली. गेल्या खरीप

हंगामापासूनच कुरबुरीला प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या मालकीची जवळजवळ १६ हजार हेक्टर जमीन आहे. शेतकी विद्यापीठ असल्याने या जमिनीचा भरपूर उपयोगही करून घेण्यात येतो. जवळजवळ ८ हजार मजूर या जमिनीवर अंगमेहनतीचे काम रोजंदारीने करीत आहेत. त्यांना कोणत्याही कामगारकायद्याचे संरक्षण नाही. राहायला दिलेल्या झोपडयांचे भाडे एवढे जबर की. पगाराचा चौथा हिस्सा भाडयापोटी परस्पर जमा व्हावा. बरे, पगार तरी महिना पद्धतीने द्यावा, तर तसेही नाही. हिशेब रोजंदारीचा. त्यामुळे रजा नाही. कामावर गेले नाही तर अर्थातच पगारही नाही. आजारी पडून पंधरा–वीस दिवस कामावर गेले नाही तर हकालपट्टी–हकालपट्टी झाली को, झोपडी खाली करून, गाशा गुंडाळून चालू लागायचे. एखादा चिकटून राहिलाच तर त्याला धक्के मारून हुसकून लावण्याची परंपरा ! कामगारकायद्याचे संरक्षण आणि संघटना नसल्याने संख्येने हजारो असले तरी बाकीच्या कामगारांनी भीतीपोटी सारा प्रकार खपवून घ्यायचा. हे असे वर्षानुवर्षे चाललेले आहे. रोजंदारी पद्धतीने काम करून पंधरा–पंधरा वर्षे झाली तरी ज्यांना कसलेही संरक्षण नाही असेही कामगार यात आहेत. अशा या विपरीत परिस्थितीमध्ये स्वत:ला काही न्याय्य हक्क प्राप्त व्हावेत किंवा असलेल्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून कोणी संघटना बांधण्याचा प्रयत्न केला की, त्याची पाळेमुळे खणून काढली जात असत. तरीही अधूनमधून एखादा गट असा प्रयत्न करीत असे; पण मग हा सारा गटच्या गटच व्यवस्थापनाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरत असे. एकदा या मंडळींना निरुपयोगी ठरविले की, त्यांना पद्धतशीरपणे त्रास दिला जात असे. पुढे आणीबाणीच्या काळात तर या चळवळयांचा पुरता बंदोबस्त करण्यात आला. आणीबाणी गेली. निवडणुका झाल्या. लोकशाहीचे नारे लगावले गेले. जनता पक्ष सत्तेवर आला; पण पंतनगरच्या शेतकी विद्यापीठामधील कामगारांची परिस्थिती होती तशीच होती. तथापी एकंदर वातावरण निवळल्याने काही मंडळींनी धीर केला. भीती पुष्कळ चेपली गेली होती. एकंदर परिस्थिती अनुकूल आहे असे पाहून गुदस्ता गांधीजयंतीच्या शुभ मुहूर्तावर विद्यापीठाच्या शेतावरील मजुरांनी कामगार–संघटन नावाची कोणत्याही राजकीय पक्षाशी अथवा राजकीय विचाराशी बांधिलकी नसलेली कामगारसंघटना स्थापन केली. जवळजवळ गुलामगिरीचे जिणे जगत असलेल्या आपल्या शेतमजुरांना संरक्षण देणे आणि त्यांच्या काही किमान गरजा पूर्ण करता आल्या तर त्या पूर्ण करणे असे कामगारसंघटनेला शोभून दिसेल असे निखळ कामगारकल्याणाचे उद्दिष्ट या संघटनेसमोर होते.

## व्यवस्थापनाची ताठर भूमिका

कामगारसंघटना आकाराला येत आहे ही गोष्ट व्यवस्थापनाला मुळीच आवडली नाही. तथापी त्यांच्या नाराजीमुळे व्यवस्थापनाचे काम थंडावले नाही. कामगारसंघटना सरकारी नियमाप्रमाणे नोंदविण्यात आली आणि दोन महिन्यांतच आपले धोरण निश्चित करून कामगारसंघटनेने आपल्या मागण्या रेटण्यास प्रारंभ केला. विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. धर्मपाल सिंग यांना एक निवेदन देण्यात आले. विद्यापीठाच्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत अशा मागण्या प्रथमच करण्यात येत होत्या. विद्यापीठ-अधिकाऱ्यांनी मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्याचे नाकारले तर गंभीर परिणाम होतील असेही या निवेदनात शेवटी नमूद करण्यात आले होते. चर्चा करण्यास डॉ. धर्मपाल सिंग फारसे उत्सुक नव्हते; परंतु नैनिताल जिल्ह्याचे मजूरउपआयुक्त यांनी त्यांना चर्चा करण्यास भाग पाडले आणि चर्चा झाल्यावर एक करार करण्यात आला–शेतमजूर म्हणून वर्षोंगणती खपणाऱ्या या मजुरांच्या मागण्या तशा अवाजवी नव्हत्याच. कायम स्वरूपाची नोकरी मिळावी, रजेचा अधिकार मिळावा, झोपडयांना भाडे आकारू नये, वापरायचे व प्यायचे पाणी मोफत मिळावे आणि गुणवत्ता प्रस्थापित करणाऱ्या कामगारांना बढतीची संधी मिळावी. या माफक व न्याय्य मागण्यांच्या संदर्भात करार करण्याची वेळ यावी ही गोष्ट उपकुलगुरूंना पसंत पडली नाही.

करार झाला तरी कामगारांना वागविण्याच्या पद्धतीत फरक पडत नव्हता. विद्यापीठाचे अधिकारी आणि पोलीस यांची हातमिळवणी झाली असल्याने कामगारांवरील इतर अन्याय तसेच चालू होते. हे अन्याय तर अशा स्वरूपाचे होते की, सरंजामशाहीची आठवण यावी. वानगीदाखल काही उदाहरणे देतो–विद्यापीठाच्या रक्षकदलातील एका अधिकाऱ्याने गावठी पिस्तुलाचा वापर केला. त्यामुळे आपल्याला डावा डोळा गमवावा लागला अशी तक्रार एका शेतमजुराने केली. दुसऱ्या एका शेतमजुराने तक्रार केली की, त्याला दोरखंडाने बांधून ठेवून मारण्यात आले. या तक्रारी करून दोन-दोन महिने झाले तरी पोलिसखात्याने काहीही हालचाल केली नाही. विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनीही दुर्लक्ष केले. परिणामी शेतमजुरांमधील असंतोष वाढत राहिला. आपल्यावरील अन्यायाकडे लक्ष वेधले जावे म्हणून कामगारांनी संप केला. ही गोष्ट गेल्या जानेवारीमधील. संप झाल्याचे समजल्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणी लक्ष घातले आणि तडजोड घडवून आणली. एकीकडे तडजोड घडवून आणायची–आणि दुसरीकडे कामगारांना धाकात ठेवण्याचा कसून प्रयत्न करायचा असे धोरण उपकुलगुरूंनी अवलंबिले. 'कामगार संपावर जातात काय–चांगली त्यांची खोड जिरवितो !' असे म्हणून कुलगुरूंनी राज्यसरकारला विनंती केली की, विद्यापीठ आवारातील रोजंदारी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांची सेवा अत्यावश्यक स्वरूपाची समजावी आणि त्यांना संपावर जाता येऊ नये. सरकारने उपकुलगुरूंचे म्हणणे मान्य करून त्याप्रमाणे हुकूम काढला. 'कर्मचारीसंघटन' या नव्यानेच स्थापन झालेल्या कामगारसंघटनेने या हुकुमाचा निषेध केला ! या हुकुमामुळे कर्मचारी आणि उपकुलगुरू यांच्यामधील तणाव आणखीनच वाढला. तथापी कामगारांच्या बाजूने कोणतीही प्रक्षोभक हालचाल झाली नाही.

## सत्तेची मस्ती–आक्रमक चाल

नवीन हुकूम हाती आल्यावर विद्यापीठ काही दिवस शांत होते. तथापी विद्यापीठाच्या आवारात संघटना निर्माण व्हावी याची उपकुलगुरूंना चीड आलीच. कामगार एकत्र आले असले तरी नवीन हुकुमाखाली दबलेले आहेत असे पाहताच उपकुलगुरूंनीही शेतमजुरांची संघटना बांधणाऱ्या ९० कामगारांना कामावरून दूर

केले. त्यांचा दोष एवढाच की, त्यांचा या कामगारसंघटनेच्या स्थापनेशी जवळचा संबंध होता. काहीही कारण नसताना आपल्या नरडीला नख लावले जात आहे हे लक्षात येताच कामगार संतप्त झाले. छुप्या हालचालींना प्रारंभ झाला आणि उपकुलगुरूंनी आक्रमक धोरण स्वीकारले. एक हजार कामगारांना अटक करण्यात आली. तथापी विद्यापीठ आपल्याला एकत्र येऊ देत नाही हे शेतमजुरांच्या लक्षात येऊन चुकले होते आणि काहीही झाले तरी आता आपण एकत्र यायचेच असा निर्धार त्यांनी केला होता. त्यामुळे शांतता निर्माण झाली तरी तिचे स्वरूप निर्मळ नव्हते. भीतीचा–दडपणाचा–अस्वस्थतेचा एक छुपा प्रवाह या शांततेखाली दडला होता आणि त्यातून केव्हाही उद्रेक निर्माण होण्याची शक्यता होती. विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना या परिस्थितीची व्हावी तितकी जाणीव झाली नाही. वास्तविक कामगारआघाडीवर कोणतेही प्रक्षोभक पाऊल उचलणे धोकादायक होते याची पुरेशी जाणीव त्यांना नसावी. आपणच येथील सर्वेसर्वा–पुन्हा राज्यातील जनता सरकार आपल्या बाजूचे. तेव्हा आपल्याला कसली भीती ? असा विचार करून त्यांनी १७ कामगारांना बेशिस्त वर्तनाबद्दल कामावरून कमी केले. बेशिस्त वर्तनाचा आरोप ठेवून कामावरून दूर करण्यात आलेले हे सर्व कामगार–कामगारसंघटन या संस्थेचे क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यांना केवळ कामावरून दूर करण्यात आले नाही, तर त्यांना अटकही करण्यात आली ! अन्य कामगारांनी जामीन राहून संघटनेच्या या कार्यकर्त्यांची सुटका करवून घेतली आणि लढयाची तयारी चालविली. प्रतिवर्षी होळीचा उत्सव विद्यापीठाच्या आवारात मोठया मजेने साजरा होत असे. तथापी या वर्षी परिस्थिती तंग असल्याने होळीसारखा संस्मरणीय सणही अगदीच रंगहीन ठरला ! कामगारांनी आपल्या चौदा मागण्या पुन्हा पुढे रेटल्या आणि त्यांचा विचार न झाल्यास अकरा एप्रिलपासून संपावर जाण्याची घोषणा केली. दरम्यान त्या विभागातील काँग्रेसपक्षीय आमदार देवबहादूर सिंग यांनी विद्यापीठाच्या उपकुलगुरूंची भेट घेऊन त्यांनी कामगारांबरोबर चर्चा करावी अशी विनंती केली. परिस्थिती कौशल्याने हाताळल्यास वातावरण निवळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला; परंतु उपकुलगुरू आता चर्चा करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यांनी स्वच्छ सांगून टाकले–' आता कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याची तयारी मी ठेवली आहे !'

## विद्यापीठात पोलिसांची छावणी

उपकुलगुरू केवळ बोलून थांबले नाहीत, तर त्यांनी परिस्थिती गंभीर असल्याचे कळवून शासनाकडे सहकार्य मागितले. विद्यापीठाच्या आवारात, इतकेच नव्हे तर शेतावरही पोलिसांच्या छावण्या उभारल्या गेल्या. विद्यापीठाच्या आवारातील परिस्थिती गंभीर झाल्याने राज्यविधानसभेमध्येही हा प्रश्न दोन वेळा निघाला; परंतु सरकारला या विषयात फारसा रस नव्हता. हा प्रश्न गृहात चर्चेसाठी निघाला त्या दोन्ही वेळी संबंधित मंत्री गृहात गैरहजर होते आणि शेतकीमंत्र्यांनी काही तरी थातुरमातुर करून वेळ मारून नेली. परिस्थिती काळजी करण्याइतकी गंभीर झाली आहे याची जाणीव कोणालाच झाली नाही !

इकडे उपकुलगुरूंनी कामगारांच्या मागण्या मान्य करण्याचे नाकारले. ' कामगार–संघटन ' या संस्थेने संप घोषित केला आणि ११ एप्रिल रोजी कामगार संपावर गेले. विद्यापीठाच्या आवारात सभा व मिरवणुकींना तातडीने बंदी घालण्यात आली. ती मोडून काढून कामगारांनी मोर्चा काढला. पोलिसांनी गोळिबार केला आणि चांगल्या दोनशेआठ फैरी झाडल्या. कामगार भयभीत होऊन सैरावरा पळू लागल्यावर त्यांचा पाठलाग करून त्यांना बंदुकीच्या दस्त्याने जीव जाईपर्यन्त मारले. या बेछूट गोळिबाराने विद्यार्थ्यांची मने हेलावली. ते पुढे धावले तर त्यांनाही मारहाण करण्यात आली. मदतीचा हात पुढे करणारा कोणीही या तडाख्यातून सुटू शकला नाही ! हजार कामगारांच्या मोर्चावर गोळीबार करून पोलिसांनी पुरुषार्थ गाजविला ! या साऱ्या प्रकाराला जबाबदार असलेले उपकुलगुरू डॉ. डी. पी. सिंग कोणालाही न सांगता विद्यापीठाचे आवार सोडून गेले ! विद्यापीठामधील एक ज्येष्ठ प्राध्यापक श्री. के. जी. गालाकोटा सध्या हंगामी उपकुलगुरू म्हणून काम पहात आहेत.

विद्यापीठामधील हा प्रकार प्रामुख्याने कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांतून निर्माण झाला असला तरी त्याचे राजकीय परिणाम आता पाहावयास मिळतात. पंतनगरमध्ये केवळ अत्याचार घडला असे नव्हे तर घडलेले रामायण दडपून ठेवण्यात आले. खोटया बातम्या देण्यात आल्या याचाही संताप जनतेला आला असून राज्यशासनाच्या राजिनाम्याची मागणी वारंवार पुढे रेटली जात आहे. आझमगढ लोकसभा–निवडणुकीमध्ये विरोधी पक्ष या अत्याचाराचा पुरेपूर लाभ उठविण्याचा प्रयत्न करणार हे तर उघडच आहे. विशेष महत्त्वाची दुसरी गोष्ट उत्तरप्रदेश मंत्रिमंडळामध्ये या प्रकाराने तणाव निर्माण झाले असून पंतनगरप्रकरण ज्या पद्धतीने हाताळले गेले त्याबद्दल शेतकीमंत्री राजेंद्रसिंग नाराज आहेत. त्यात विद्यापीठाचे बदनाम उपकुलगुरू डॉ. डी. पी. सिंग यांचे व त्यांचे जवळचे संबंध आहेत. डी. पी. सिंग यांनी राजिनामा द्यावा असा सल्ला मुख्य मंत्र्यांनी दिला असता त्यांनी तो मानलेला नाही हेही लक्षात घेण्यासारखे आहे. पंतनगरमधील हत्याकांडाच्या बातम्या पसरू लागताच अनेक राजकीय नेते विद्यापीठात येऊन गेले. शब्दाने सहानुभूती देऊन आपलेसे करून घेण्याची ही संधी इंदिराजी दवडणे शक्यच नव्हते. त्या तातडीने पंतनगरला येऊन गेल्या आणि पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या–संकटग्रस्त जनतेची भेट घेऊन दिलासा देणे हे माझे कामच आहे आणि आता मला त्याची सवयही झालेली आहे. कोणा पत्रकाराने खोचक प्रश्न विचारला की, ' बाई, आपण सत्तेवर असताना कुटुंबनियोजनाचा जो सक्तीने प्रचार चालू होता, त्याला सुलतानपूर आणि मुझाफरनगर येथील नागरिकांनी विरोध केला. सक्तीच्या निर्बीजीकरणास विरोध केला म्हणून पोलिसांनी त्या वेळी त्यांच्यावर गोळया चालविल्या. आपण त्या वेळी तेथे गेला असाल्च ! ' बाई पुसटते–' नो ' म्हणून पुढे सटकल्या.

विद्यार्थी चळवळींनी सारा उत्तर प्रदेश पेटून निघाला असताना आणि पश्चिमेकडील मिरतपासुन पूर्वेकडील गोरखपूरपर्यंन्त अनेक विद्यापीठे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून बंद पडण्याची भीती निर्माण झाली असताना पंतनगरच्या विद्यार्थ्यांनी–शिक्षकांनी एवढे भीषण व क्रूर

पृष्ठ २० वर

# चक्रम्चक्री ( ३४ )

दीर्घस्मृति विश्वनाथ

# एक भाबडी मैत्री

मी आठ–नऊ वर्षांचा असताना 'जगात वागावं कसं ?' हे पुस्तक माझ्या हाती पडलं. त्यातला उपदेशाचा भाव, घरातल्या आठ–दहा वडीलधाऱ्या मंडळींचा उपदेश ऊठ–बस ऐकण्याची सवय असूनदेखील, मला बोचल्याखेरीज राहिला नाही. मला सगळं कळतं, हे ऐकलं नाहीस तर व्यवहारात गोते खाशील, साध्यासुध्या गोष्टीसुद्धा अगदी गचाळपणे तू करतोस असं वाचकाच्या मनावर बिंबविण्यासाठी हे पुस्तक लिहिलं असावं असाच त्या पुस्तकाचा झोक होता. केर काढणं, मोठ्या माणसासमोर उभं राहणं, केळं खाणं, फुलपात्रातून पाणी पिणं अशा साध्या गोष्टींतदेखील इतके बारकावे दिलेले होते की, ते आपल्या लक्षात येत नाहीत याबद्दल लाज वाटण्यापेक्षा हा कोण चिकित्सक डुढ्ढाचार्य लागून गेला! असा लेखकाचाच राग येई.

पण इतकं असूनही गंमत ही की, ते पुस्तक न वाचता सोडून द्यावं असं मात्र मला वाटलं नाही आणि त्याचं त्या वेळी देखील आश्चर्य वाटलं. त्यानंतर दोन–तीन दिवस मी मित्रमंडळींच्यात त्या पुस्तकाची नाना परींनी टिंगलही केली. पुस्तकातल्या उपदेशाप्रमाणं वागणं मलाच काय पण कोणालाही जमेल असं मला वाटलं नाही. अजूनही फुलपात्रानं पाणी पिताना 'जगात वागावं कसं ?' तील उजव्या हाताच्या अंगठ्यावरून पाणी तोंडात सोडावं. भांडं उष्टावू नये ही सूचना मला आठवते; पण तसं वागणं जमत नाही. 'केळं खाताना सालाचा एक तुकडा तोडून केळ्याचं देठाकडील टोक पुसावं' हे मला आज इतक्या वर्षांनंतरही आठवतं; पण अजूनही असं विधिपूर्वक केळं खाणं माझ्यानं होत नाही नि तसं कोणी करीत असल्याचं मी पाहिलेलंही नाही.

पुस्तकातल्या सूचना अशा वळणात बसण्याजोग्या नसताना, त्यातला अहंभावपूर्वक उपदेश खुपत असतानाही मी आणि माझ्यासारख्या अनेक मुलांनी हे पुस्तक का वाचलं असेल? त्याच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या का निघाल्या असतील? मराठीत त्यानंतर रीतभात शिकवणारी आणि व्यावहारिक बारकावे समजावून सांगणारी पुष्कळ पुस्तकं झाली. हणमंत्यांचं 'व्यवहार आणि शिष्टाचार' हे सूत्रमय पुस्तक 'जगात वागावं कसं ?' च्या आगंमागंच निघालं. श्री. वा. काळ्यांची पुस्तकंही बरीच गाजली. गेल्या चार–पाच वर्षांत तर व्यवहार शिकविणारी डझनावारी पुस्तकं प्रकाशित झाली आहेत; परंतु वेलणकरांच्या 'जगात वागावं कसं ?' ची सर यांपैकी एकाही पुस्तकाला नाही. पाच आवृत्त्यांत मिळून १९–२० हजार प्रती खपलेलं हे एकच पुस्तक!

### वेगळा वाण

वाचकाला कमी लेखणारा उपदेशपर सूर सोडला तर 'जगात वागावं कसं ?' या पुस्तकात आकर्षक गोष्टी पुष्कळच होत्या. पहिलं म्हणजे त्यात खूप चित्रं होती. चित्रं जोडीनं दिलेली होती. 'असं करू नये' हें दाखविणारं एक आणि 'कसं करावं' हे दाखविणारं दुसरं. चित्रं चांगली ठसठशीत आणि बाळबोध होती. त्यामुळं करमणूक तर होईच; पण त्या चित्रांची टवाळीही करता येई. दुसरी आकर्षक बाजू म्हणजे मुद्दा गळी उतरविण्यासाठी दिलेल्या गोष्टी किंवा चुटके. पायताणं कोणती वापरीत याचा सल्ला देताना लेखकानं पंजाबी चढावांची शिफारस केली होती. पंजाबी चढावच का, याचं उत्तर देण्यासाठी चोराच्या पाठलागाची गोष्ट सांगितली होती. इतर पादत्राणं वापरणारे पाठलागात कसे फसले व पंजाबी चढाव वापरणारा विद्यार्थी मात्र चोर पकडण्यात कसा यशस्वी झाला याची गोष्ट मोठी रंगतदार पण तितकीच गैरलागूही होती. कारण क्वचित् कधी चोराचा पाठलाग करण्यासाठी बेढब पंजाबी चढाव कोण वापरील? पुस्तकातली तिसरी आवडणारी गोष्ट म्हणजे बलोपासनेवर दिलेला भर. रट्टयाला रट्टा दिलाच पाहिजे, मेंगं राहून चालणार नाही, जवळ धारदार चाकू बाळगून जरूर तर त्याचा उपयोग करताना डगमगता कामा नये अशी एक धश्चोट शिकवण रांगड्या आणि निरलंकार भाषेत सर्वत्र दिली होती.

पण या सगळ्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपला सल्ला म्हणा, हितोपदेश म्हणा वाचकानं स्वीकारावा या हेतूनं अशा शिष्टाचार–शिक्षकी पुस्तकांचे लेखक वाचकाला कुरवाळण्याचा, अंजारण्या–गोंजारण्याचा किंवा सुखविण्याचा जो प्रयत्न करतात त्याचा पूर्ण अभाव 'जगात वागावं कसं ?' मध्ये होता. इंग्रजीत डेल कार्नेजीनं अशी उपदेशपर पुस्तकं बरीच लिहिली आहेत; पण त्यात सगळा उपदेश कसा काचसामानाच्या दुकानात वस्तू घासून–पुसून लख्ख करून आणि किमतीच्या चिठ्ठ्या लावून मांडून ठेवाव्यात तसा विक्रीसाठी मांडून ठेवलेला आढळतो. वेलणकरांच्या लिखाणाचा एकूण झोकच असा की, मी सांगतोय् ते वाचकाच्या हिताचंच आहे, त्यानं ते मानलंच पाहिजे; न मानेल तर त्याच्यासारखा करंटा तोच! माल चोख आहे, गिऱ्हाइकाला त्याची जरूर आहे, दुकानाबद्दल बाजारात विश्वास आहे, मग विक्रयकलेतल्या हातोट्या वापरण्याची गरजच नाही असा आविर्भाव पुस्तकात आढळतो.

गेल्या पाच-सात वर्षांत– मराठी माणूस मागं पडत आहे या परंपरागत समजुतीतून– व्यवहार शिकविणारी अनेक पुस्तकं बाजारात आली. कित्येक नियतकालिकांतून तशा प्रकारची सदरंही सतत चालत असतात. त्यात विक्रयकलेतील चलाख्यांचा भरपूर उपयोग केलेला असतोच; पण उपदेशकाचा

आणखी सूर असाही असतो की, व्यवहारात यशस्वी व्हायचं असेल तर सोवळेपणा सोडला पाहिजे. नीति-नियमांना गुंडाळून ठेवले पाहिजे, कायद्याची जरब बाळगून चालणार नाही, दारू पिणे किंवा व्यावसायिक हित-संबंध राखण्यासाठी करावयाच्या इतर गोष्टी करणे यांच्या आड 'कन्व्हिक्शन्स्' आणता कामा नयेत इत्यादि. यात अर्थात वाचकाला थोडेफार कुरवाळलेही जाते. म्हणजे असे की, आजवरचे अपयश आपण नीतिशुद्ध वागत होतो म्हणून आले होते, असे समाधान त्याला करून घेता येते. थोडक्यात म्हणजे व्यावहारिक यश हे महत्त्वाचे, त्यासाठी काहीही किंमत द्यावी.

चार-सहा महिन्यांपूर्वी चरक-पंप-शेंगायंत्र विकणाऱ्या मासिकात श्री. वा. काळे यांच्या उपदेशपर सदरात असाच एक मजकूर वाचला. एका कंपनीत रिसेप्शनिस्टच्या जागे-साठी स्त्री उमेदवार मुलाखत द्यायला आल्या होत्या. मुलाखतकारानं प्रश्न विचारला, 'मद्य पिण्याची तुमची तयारी राहील का?' एका मुलीने 'नाही' म्हणून सांगितले. दुसरीने 'कंपनी (म्हणजे सवंगडी) चांगले असतील तर घेईनही' असे उत्तर दिले. दुसरी उमेद-वार निवडली गेली. काळ्यांनी तिची पाठ थोपटली.

अशा तऱ्हेचा उपदेश मला तरी सवंग आणि धरबंध सोडलेला वाटतो. वेलणकरांच्या 'जगात वागावं कसं?' या पुस्तकात असला सवंगपणा कोठेही आढळणार नाही. वाच-काचा व्यावहारिक उत्कर्ष व्हावा या हेतूनं या पुस्तकातला उपदेश केलेलाच नाही. वाचक संभावित व्हावा, चारचौघात वावर-ताना त्याचे हसे होऊ नये, त्याच्या सहवासा-पासून इतरांना सुख व्हावे यासाठी रीतभात शिकविणे इतकाच पुस्तकाचा हेतू होता. आता हे खरे आहे की, शिष्टाचार कोणत्याच कोष्टकात बसत नाही आणि दर प्रसंगाला तारतम्य वापरून वागावे लागते. त्यामुळे चालीरीती शिकविणाऱ्या पुस्तकांचा उपयोग मर्यादितच असतो. शिळोप्याच्या गप्पा यापलीकडे अशा व्यवहारोपदेशी पुस्तकांचा काही उपयोग होतो असं वाटत नाही आणि गप्पाच ऐकावयाच्या असतील तर काळ्यांच्या बाजारगप्पा ऐकण्यापेक्षा धनी वेलणकरांच्या बालबोध गप्पा ऐकणे मला तरी आवडेल.

## कर्तबगारीचे माप

वेलणकर हे बलदंड आणि कर्तृत्ववान गृहस्थ होते. या दोन्ही गोष्टींचा त्यांना अभिमान होता. द्रव्यसंपदा आणि शरीरसंपदा आपण कशी कमविली हे सांगण्याची त्यांना मोठी हौस होती व विनय किंवा संकोच यांचे बंधन ही हौस मानीत नसे. 'मी कारखानदार कसा झालो?' या आत्मचरित्रात आपली कर्तबगारी धनीसाहेबांनी साऱ्या महाराष्ट्राला श्रोतृवृंद कल्पून निःसंकोचपणे सांगितली आहे.

आपल्या कमविलेल्या देहाने कसे अकटो-विकट परिश्रम केले याची कलमवार यादीच या आत्मचरित्रात दिली आहे. कुस्त्या, त्यात मिळविलेली बक्षिसे, सामानाची पोती एक-ट्याने उचलणे, बुक्कीने नारळ फोडणे, पायावर बावीस डागण्या घेऊन लगोलग १०–१५ मैल चालणे, छप्पन्नाव्या वर्षी ७००० पायऱ्या चढणे–उतरणे, दोन–तीन आठवड्यांची लंघने अशा अनेक गोष्टी त्यात आहेत. आपण आपला तगडा देह रोज सकाळी व्यायामानंतर आरशात नजरेने कुरवाळतो आणि त्याचे कौतुक करतो असेही त्यांनी कृतार्थतेने सांगितले आहे.

आपल्या औद्योगिक कर्तबगारीचेही असेच मनसोक्त कौतुक या आत्मचरित्रात आहे. १९१२ साली ७००० रु. कर्जातून तीन माग घेऊन चालू केलेला कारखाना १९४७ साली ३०० माग व ८००० चात्यांचा झाला; खेरीज स्वतःची दहा एकर जमीन, विहीर, नोकर लोकांसाठी चाळी सर्व मिळून अडीच लाख चौरस फूट बांधीव इमारत, मुंबईत पाच चाळी अशी वतनवाडी निर्माण केली. याउप्पर सुवर्णतुलेचा पाच लाखांचा दान-धर्मही झाला असा आपल्या जिंदगीचा हिशेब 'मी कारखानदार कसा झालो?' मध्ये आहे.

कोणतीही नवी युक्ती दिसली, निराळे कौशल्य आढळले की ते स्वतःला प्राप्त करून घ्यायचे अशी वेलणकरांची उमदी वृत्ती होती. साप पकडणे, बुक्कीने नारळ फोडणे या गोष्टी ते अशा हौसेने शिकले. त्याखेरीज घरगुती औषधे आणि अनुपाने, व्यायामाचे प्रकार, कारखान्याच्या यंत्रसामुग्रीत केलेल्या बारीक-सारीक सुधारणा अशा अनेक बाबी या आत्मवृत्तात विखुरलेल्या आहेत. वाच-तांना असे वाटते की, हा मनुष्य स्वतःवर इतका खूश आहे की आपली प्रत्येक गोष्ट तपशिलानिशी समजावून सांगितल्याखेरीज याला चैनच पडत नाही?

आपल्या दीर्घ आणि कर्तृत्वसंपन्न आयु-ष्यात वेलणकरांना जगाचे बरेवाईट अनुभवही भरपूर आले. भाऊबंदांशी वर्षानुवर्षे झगडा झाला, ज्याने मूळ भांडवल दिले त्या सास-ऱ्याशी पटले नाही, आपल्या कर्तबगारीचे कौतुक न करणारी पत्नी मिळाली, तेजीमंदी आणि स्पर्धा यांचे उन्हाळे–पावसाळे सोसले आणि सर्वांवर कडी म्हणजे गुंडांनी आयु-ष्याची कमाई घातलेला कारखानाही जाळला! याबरोबरच कृतार्थतेने अडवीत रहावे असे प्रसंगही घडले. लोकमान्य टिळकांनी पाठ थोपटली, सुवर्णतुला झाली, मुलगा आणि जावई हाताशी आले!

या सर्व हकीकती वेलणकरांनी आत्म-चरित्रात गोष्टीवेल्हाळपणाने आणि हौसे-हौसेने सांगितल्या आहेत. हे खरे की हे सर्व लिखाण कुठेच लालित्याची पातळी गाठीत नाही आणि वर्णिलेले अनुभव बहुश: व्यक्ति-गतच राहतात; पण असे असूनही हे सबंध पुस्तक आपण शेवटपर्यंत वाचतो आणि हाताशी असेल तर पुन्हा पुन्हा चाळतोही! हे असे का व्हावे?

## ब्राह्मणी भाबडेपणा

१९५० सालापर्यंत मराठी ब्राह्मणसमा-जात एक उभारी होती. आपण कर्तृत्ववान आहोत असा विश्वास होता आणि हे कर्तृत्व स्वतःसाठी किंवा कुटुंबासाठी नसून साऱ्या साऱ्या समाजासाठी आहे अशी श्रद्धा होती. आता बऱ्याच जणांचे कर्तृत्व चाकोरीतलेच असे आणि श्रद्धेनुरूप समाजमनस्कता सर्वां-च्याच जवळ नसे, हेही खरेच आहे; पण मुद्दा ब्राह्मणसमाजाच्या प्रत्यक्ष वर्तनाचा नसून त्याच्या भावनेचा आहे. आपण समा-जाचे पुढारी आहोत, शिष्टाचाराचे आणि कर्तृत्वाचे मानदंड आपल्यावरून ठरणार आहेत असा तो विश्वास होता. याचे पुरावे तत्कालीन लिखाणात अनेक आढळतात. एकच उदाहरण सहज आठवते म्हणून सांगतो. प्रा. पु. ग. सहस्रबुद्धयांनी आत्म-वृत्तात लिहिले आहे की, माझी कुंडली पाहून राष्ट्रगुरू होण्याची याची लायकी आहे, असे

पृष्ठ १४ वर

# स्वायत्तता : जुनी ठिणगी, नवा प्रक्षोभ

प्रा. ज. रा. शिंदे, परळीकर

'केंद्र-घटक' संबंधाचा पुनर्विचार होऊन घटक-राज्यांना अधिक स्वायत्तता द्यावी ही मागणी तशी जुनीच आहे. काही राज्यांच्या बाबतीत तर ती आपल्या स्वातंत्र्याइतकी जुनी आहे. राज्यघटनेने काश्मीरचा 'विशेष दर्जा' मान्य केलेला असून सुद्धा शेख अबदुल्लाह आणि त्यांचा पक्ष केंद्र-घटकसंबंधांच्या स्वरूपावर पूर्वीपासूनच नाराज आहे. तामिळनाडूतील द्रमुकची स्थापना तर पूर्णतः फुटीर प्रवृत्तीतूनच झालेली आहे. तामिनाडू हा भारताचा अविभाज्य घटक या प्रस्थापित तथ्याशी नंतर त्या पक्षाने तडजोड केली तरी घटक राज्यांना अधिक स्वायत्तता असावी ही मागणी त्याने कधीच सोडली नाही. 'द्रमुक' आणि नंतर 'आण्णा द्रमुक'ची तेथील अविचल सत्ता तेथील जनतेत ही स्वायत्ततेची मागणी किती दृढ आहे यावर प्रकाश टाकते. केरळ पूर्वीपासूनच केंद्राच्या असमर्थनीय सत्तेवर नाराज आहे. नागालँडमधील फुटीर चळवळ या वर्गात मोडत नाही.

ही स्वायत्ततेची मागणी जुनीच असली तरी आज नव्याने ती पुढे येत असताना तिचे स्वरूप आणि परिसीमा बदलेल्या आहेत. पूर्वी निरनिराळ्या राज्यांनी निरनिराळ्या वेळी ही मागणी कमी-अधिक आवेशाने केली. सर्वांनी एकाच वेळी या मागणीसाठी सारखाच दबाव आणला नाही. स्वायत्ततेचा पाठपुरावा करणाऱ्या या शक्ती त्या वेळी विभक्त होत्या. आता ही मागणी एका सुरात होऊ लागली आहे. शिवाय पूर्वीच्या तुलनेने आता या मागणीस व्यापक पाठिंबा आहे. स्वायत्तेच्या या समूहगीतात आता प. बंगाल, काश्मीर, तामिळनाडू यांच्या बरोबरच आंध्रप्रदेश, कर्नाटक-त्रिपुरा आणि महाराष्ट्र ही राज्ये सामील झाली आहेत. या सर्व राज्यात 'बिगरजनता' सरकारे स्थापन झाली आहेत. गेल्या तीस वर्षांच्या काळात काही अपवाद वगळता केंद्रात सत्तेवर असलेला काँग्रेस पक्षच राज्यातही सत्तेवर होता. केरळ आणि तामिळनाडू हे ते अपवाद. १९६७ च्या निवडणुकीत उत्तरेकडील अनेक राज्यांतून काँग्रेस सत्तेवरून फेकली गेली असली तरी ही अवस्था अल्पकालीन ठरली. शिवाय या काँग्रेसेतर सत्ता स्थापित झालेल्या या उत्तर भारतातील राज्यांचा उपलब्ध घटनात्मक व्यवस्थेवर कधीच फारसा रोष नव्हता. **ही स्वायत्ततेची मागणी प्रामुख्याने केंद्रातील उत्तरभारताच्या प्रभावाच्या विरोधात दक्षिण आणि पूर्व भारताची आहे.**

उदा० केंद्रातील उत्तरभारताच्या प्रभावामुळे हिंदी भाषा लादली जाईल आणि त्यामुळे आपली सांस्कृतिक अस्मिता चिरडली जाऊन दक्षिण भारत उत्तरेची कायम वसाहत बनेल आणि आपल्यावर सारखे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक स्वरूपाचे अत्याचार होत राहतील अशी भीती सर्व दक्षिणी राज्यांना वाटते. तामिळनाडूतील द्रमुक पक्ष आणि त्याची लोकप्रियता काही अंशी याचेच प्रतीक आहे. दुसरी गोष्ट, पूर्वी जिथे 'बिगर काँग्रेस' सरकारे होती ती बहुतेक संमिश्र सरकारे होती. त्यामुळे ती दुबळी होती आणि अल्पजीवी ठरली. या वेळी घटक राज्यातील बिगरजनता सरकारे एकपक्षीय, प्रबळ आणि जनतेचा भरघोस पाठिंबा असलेली आहेत. तामिळनाडूत आण्णा द्रमुकचे तर आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात इंदिरावादी काँग्रेसचे सरकार जनतेच्या भरघोस पाठिंब्यावर निवडून आलेले आहे. पंजाबातील अकाली दलाचे सरकार तसेच भक्कम आहे. प. बंगालमधील डाव्या आघाडीचे सरकार संमिश्र सरकार असूनही यापूर्वी तेथे व इतरत्र असलेल्या संमिश्र सरकारांप्रमाणे ते दुबळे नाही. यापूर्वी इतरत्र झालेल्या आघाड्या तत्त्वहीन होत्या. त्यांच्यात ध्येय-धोरणांच्या बाबतीत एकवाक्यता नव्हती. बंगालमधील डाव्या आघाडीचे तसे नाही. अंतिम उद्दिष्टांच्याबद्दल त्यांच्यात पूर्ण मतैक्य आहे. त्यामुळे तेथील सरकार हे अन्य संमिश्र सरकारांप्रमाणे दुबळे नाही. केरळमधील काँग्रेस-कम्युनिस्ट युतीचे सरकार त्या मानाने काहीसे दुबळे असले तरी तेथील परिस्थितीत ते चांगलेच स्थिर आहे. काश्मीरमध्ये शेख अब्दुल्लाह आणि त्यांच्या नॅशनल कॉन्फरन्सची लोकप्रियता ही सारखी वाढतच आहे. त्रिपुरामध्ये एकट्या मार्क्सवाद्यांना दोनतृतियांश बहुमत आहे. साठ सदस्यांच्या गृहात चार जागा वगळता सर्वच जागा तेथील डाव्या आघाडीने जिंकल्या आहेत. नाही म्हणता महाराष्ट्राची स्थिती काहीशी डोलायमान आहे.

### आताच हा नवा उद्रेक कशामुळे?

ही मागणी नव्याने प्रज्वलित होण्याची काही कारणे आहेत. अमर्यादित अवस्थेकडे वाटचाल ही सत्तेची प्रवृत्तीच असते. त्यामुळे घटनेतील तरतुदींचा गैरवापर होतो. भूतकाळात काँग्रेसने ( केंद्र सरकारने ) प्रतिवर्षी सरासरीने एक तरी बिगरकाँग्रेस सरकार बरखास्त केले आहे. आता बिगरजनता सरकारांना याची जनता पक्षाकडून जास्त भीती वाटते. 'जनता पक्षात अतिरेकी आणि असहिष्णु लोक आहेत. काही तर उच्छृंखल आणि लहरी आहेत. त्यांच्यात ध्येय-धोरणाबद्दल एकवाक्यता नाही. त्यामुळे ही बिगर-जनता सरकारे त्यांच्या नजरेत सारखी सलत राहाणार. ती बरखास्त करण्यासाठी ते संधीचीच वाट पाहाणार. शिवाय काँग्रेसप्रमाणे देशभर आपल्याला अबाधित सत्ता प्रस्थापित करता आली नाही ही गोष्ट त्यांना चांगलीच बोचली आहे. त्यांच्यात अंतर्गत संघर्षही

भयंकर आहेत. त्यामुळे कधी आपल्या दुबळेपणाच्या न्यूनगंडावर पांघरूण घालण्यासाठी, तर कधी अंतर्गत संघर्षाचा परिणाम म्हणून हे लोक बिगरजनता सरकारे बरखास्त करण्याचा प्रयत्न करणार' असेही या सरकारांना वाटते आणि याला पुरावाही आहे. कांग्रेसने सरासरीने वर्षाला एक सरकार बरखास्त केले तर जनता पक्षाने एक वर्षात दहा सरकारे बरखास्त केली. बिगरजनता सरकारांच्या भीतीची आणखी एक प्रकारे मीमांसा करता येते. कांग्रेसचे सरकार हे व्यवहारवादी होते. म्हणजे तत्त्वनिष्ठेपेक्षा ते व्यवहाराला अधिक महत्त्व देत होते. याच मुद्द्यावरून, कांग्रेस हा पक्ष नसून ते तत्त्वहीन सत्तापिपासू लोकांचे एक विचित्र गाठोडे आहे, अशी आजच्या जनता पक्षातील नेत्यांनी गेली तीस वर्षे टीका केलेली आहे. त्या तुलनेने जनता पक्ष बराच तत्त्वनिष्ठ आहे–निदान तसा तो आव आणतो आहे. आता त्यांची तत्त्वनिष्ठेची भाषा खरी असली तर एक अडचण आणि खोटी असली तर दुसरी अडचण. त्यांची तत्त्वनिष्ठेची भाषा खरी असेल तर तिचा एक अर्थ असा होतो, की ते व्यवहारजन्य दडपणांना कधीच भीक घालणार नाहीत. आपला पराभव झाला तरी चालेल. सत्ता आली काय आणि गेली काय आपण तात्त्विक भूमिकेवरून मुळीच मागे सरणार नाही असा त्याचा अर्थ आणि हा सूर अनेकांच्या वक्तव्यातून आणि भूमिकेतून व्यक्त होताना दिसत आहे. दारुबंदीसारख्या य:कश्चित प्रश्नावर पंतप्रधान मोरारजी देसाई आपली सर्व प्रतिष्ठा आणि शासनाचे भवितव्य पणास लावतात यात हीच वृत्ती प्रतिबिंबित होते. तो जनतानेत्यांच्या आत्मगौरवित नैतिकतेचा एक नमुनाच आहे. याचा राजकारणात असा अर्थ निघतो, की एखादे सरकार बरखास्त करावयाचे ठरविल्यास मग आपली सत्ता टिकते किंवा नाही या व्यावहारिक गोष्टीचा विचार न करता ते आपला निग्रह पूर्ण करण्याच्या मागे लागणार. मग तो निग्रह चूक असो की बरोबर असो, व्यवहार्य असो वा नसो. आता त्यांची तत्त्वनिष्ठेची भाषा खोटी असली तरी दुसरी अडचण. अशा स्थितीतील तत्त्वाच्या नावावर तत्त्वहीन कृत्ये होणार. आपण तत्त्वनिष्ठ आहो हे सिद्ध करण्यासाठी कसल्याही 'वेडगळ,' 'अव्यवहार्य' धोरणाचा तत्त्वनिष्ठेच्या आवेशाने पाठपुरावा होणार. या प्रकारची जी प्रतिमा जनता पक्षाने आपल्या एक वर्षाच्या कारकीर्दीत इतर पक्षांच्या आणि काही पक्षनिरपेक्ष विचार करणाऱ्या नागरिकांच्या मनात निर्माण केली ती वाईट गोष्ट झाली. दूरगामी दृष्टिकोनातून ही जनता पक्षाच्या पराभवाची नांदी ठरण्याची शक्यता आहे. यातून बिगरजनता सरकारांच्या मनात भयाची भावना निर्माण होते. तशी ती झाली आहे आणि स्वायत्ततेची मागणी आजच एवढ्या जोमाने पुढे येण्याचे ते एक कारण आहे. शिवाय जनता पक्षाने घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याची घोषणा जाहीरनाम्यात केलेली होती. बिगरजनता सरकारांना घटनेतील तरतुदींचा गैरवापर होईल अशी भीती वाटण्याची आणखीही निरनिराळी कारणे आहेत. काश्मीरमध्ये शेख अब्दुल्लासाहेबांना जनता पक्षातील जनसंघाची भीती वाटते. काश्मीरचा विशेष दर्जा जनसंघाने कधीच मनापासून स्वीकारलेला नाही. पुढेही याबाबत त्या पक्षाची भूमिका बदलेल याचे चिन्ह दिसत नाही. त्यामुळे घटनेत बदल करून केन्द्राला आपल्या कारभारात हस्तक्षेप करता येणार नाही अशी तरतूद केलेली बरी असे शेख अब्दुल्लांना वाटते. तामिळनाडू आणि द्रमुकला जनता पक्षाच्या हिंदी प्रेमाची भीती वाटते. कर्नाटक आणि आंध्रातील इंदिरावादी कांग्रेस सरकारांना जनता पक्षाच्या इंदिराविरोधाचे आणि सूडाच्या भावनेचे भय वाटते. बंगाल आणि त्रिपुरातील डाव्या आघाडीच्या सरकारांना जनता पक्षात प्रभावी असलेल्या कडव्या प्रतिगामी प्रवृत्तींचा संशय वाटतो. अशी प्रत्येकाची निरनिराळी कारणे सुद्धा या मागणीमागे आहेत.

### बंगालचा पुढाकार का ?

केन्द्रांच्या अतिरिक्त सत्तेवर बंगाली माणूस पूर्वीपासूनच रुष्ट आहे. केन्द्राच्या अतिरिक्त सत्तेचा बंगालला काही लाभ होणे दूरच, उलट त्यांच्यावर सारखे अन्याय होत आले आहेत १९४७ साली जेव्हा देशाची फाळणी झाली तेव्हा बंगालचीही फाळणी झाली. १९०५ च्या वंगभंगाप्रमाणेच या फाळणीलाही बंगालचा विरोध होता. म्हणजे १९४७ ची ही फाळणीसुद्धा त्यांच्या इच्छेविरुद्ध त्याच्यावर लादली गेली. या फाळणीतून बंगालपुढे संकटांची मालिका उभी राहिली. एकातून एक समस्या निर्माण होत गेल्या. निर्वासितांचे लोंढे आले. ते आजही येतच आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण झाले. लोकसंख्येतही त्यामुळेच भरमसाट वाढ होत राहिली. या वाढीव लोकसंख्येला सामावून घेऊन तिचे कायमचे पुनर्वसन करण्यासाठी तेथे प्रचंड प्रमाणावर उद्योगधंद्यांत वाढ करणे आवश्यक होते. याशिवाय शेतीसुधारणेचा कार्यक्रम व्यापक प्रमाणावर हाती घेणे आवश्यक होते. या कामी बंगालला संपूर्ण राष्ट्राने एकदिलाने मदत करावयास हवी होती, पण तसे काही झाले नाही. परिणामी बंगालचे प्रश्न तसेच राहिले. किंबहुना दिवसेंदिवस वाढत जाऊन त्यांचा गुंता अधिकच गंभीर होत गेला. संपूर्ण राष्ट्र जर बंगालवरील या भयानक संकटांच्या बाबतीत त्याच्या मदतीस धावून जात नसेल तर आपण ज्याला राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता वगैरे म्हणतो त्यांचा त्यांनी कोणता अर्थ घ्यावा आणि त्यांना त्याचे महत्त्व का वाटावे ?

बंगालच्या संयुक्त सरकारसमोर सध्याही अडचणींचे डोंगर उभे आहेत. तेथील बरेच उद्योग आज बंद आहेत. सरकारने ताब्यात घेतले तरच ते उद्योग चालू होतात; पण घटनेतील तरतुदीप्रमाणे एक तर ते केन्द्राने ताब्यात घ्यावे किंवा बंगाल शासनाला ते ताब्यात घेण्याची अनुमती देऊन आवश्यक ते आर्थिक सहाय्य करावे, यासाठी तेथील शासनास दिल्लीकडे डोळे लावून वाट पाहात बसण्यापलीकडे काहीच करता येत नाही. तसेच बंगालचा आजही शेती हाच प्रमुख उद्योग आहे. या शेतीचे अनेक प्रश्न आहेत. तेही तेवढेच गुंतागुंतीचे आहेत. या प्रश्नांशी तेथील लक्षावधी लोकांच्या उपजीविका निगडित आहेत. आता हे प्रश्न तातडीने न सोडवावे तर वचनभंग होतो. जनतेचा विश्वास गमावून बसण्याची पाळी. सोडवावे तर आपल्या हाती काही नाही. ही कोंडी. आता शेतीच्या बाबतीत काही कडक उपाययोजना करू जावे तर केंद्रातील स्थितीवादी शक्तींचा रोष ओढवून घ्यावा लागतो. कायदा व सुव्यवस्थेसारख्या सबबी पुढे करून ते केंद्रास हस्तक्षेप करावयास भजबूर करू शकतात. या डाव्या आघाडीच्या दृष्टीने केंद्रातील जनता सरकार कोणताही मापदंड लावला तरी स्थितीवादी,

प्रतिगामी, भांडवलशाही धार्जिणेच. त्यातील काही घटक तर पूर्वाश्रमीचे मार्क्सवाद–समाजवाद यांचे कडवे विरोधक. त्यातून पक्षाच्या अंतर्गत त्यांचा प्रभाव मोठा. त्यांची या डाव्या आघाडीच्या सरकारवर विशेष वक्रदृष्टी. असा हा अनेक पदरी पेच नरडघाशी येऊन पोहोचला तेव्हा तेथील शासनाने स्वायत्ततेच्या मागणीस प्रारंभ केला. त्यांच्यापुढे याशिवाय दुसरा पर्यायच उरला नाही.

### मागणीचे स्वरूप काय ?

बंगालच्या शासनाने मागणीचा एक मसुदा तयार केला आहे. स्वायत्ततेची मागणी करणाऱ्या सर्वच राज्यांनी त्यास मान्यता दिली आहे असे नव्हे; परंतु मागण्यांचे स्वरूप पाहता एक गोष्ट सहज लक्षात येते की, यांना कोणाचा विशेष विरोध असणार नाही. मतभेद असलेच तर ते कोणत्या मागणीवर विशेष भर द्यावा येवढयाच मर्यादित. या मागण्या साधारणपणे घटनेतील कलम ३५६ व ३५७, ३६०, ३०२, २४८, २४९, २८० (२), २८०(३), २८०(३) (अ), २०० आणि २०१ यांच्या संदर्भात आहेत. कलम ३५६० ३५७ नुसार राष्ट्रपती, राज्यसरकारे किंवा विधान-सभा किंवा दोन्ही बरखास्त करून तेथे राष्ट्रपती-राजवट लागू करू शकतात, असा निर्णय राष्ट्राध्यक्ष राज्यपालाच्या अहवालानुसार किंवा त्यावाचूनही घेऊ शकतात. राज्यपाल आणि राष्ट्रपतीचे पदसुद्धा जेथे पक्षनिष्ठेचे बक्षीस म्हणून देण्याचा संकेत प्रस्थापित झाला आहे तेथे ही पदेही सत्ताधारी किती निःपक्षपातीपणे वापरतील हे सांगणेच नको.

घटक सरकारांना आपली धोरणे आणि नीती यांचा स्वीकार करावयास लावण्यासाठी या अधिकाराचा केंद्राकडून दडदण म्हणून वापर केला जाऊ शकतो. तसा वापर झालेला आहे. पुढे होणार नाही याची खात्री देण्यासारखी परिस्थिती नाही, संघराज्यात असा अधिकार केंद्राला का असावा ? घटक राज्यात वेगळ्या पक्षाचे सरकार असू शकते या गृहीतकृत्यावर संघराज्याची संकल्पना उभी आहे. वेगळ्या पक्षाचे सरकार असू शकते याचाच अर्थ त्याची धोरणे केंद्रापेक्षा वेगळी असू शकतात, तशी असण्याचा व ती त्यांच्या मर्यादित क्षेत्रात राबवण्याचा या घटक सरकारांना हक्क आहे, हे संघराज्याचे दुसरे गृहीतकृत्य. मग राष्ट्रपतीला वरील अधिकार कशासाठी ? तसेच कलम ३६० प्रमाणे आर्थिक अस्थिरतेच्या कारणावरून राष्ट्रपती घटकराज्याच्या कारभारात हस्तक्षेप करू शकतात. येथेही आर्थिक अस्थिरता आहे हे राष्ट्रपतीच ठरवणार आणि तेच नंतर हस्तक्षेप करणार. कलम २०० आणि २०१ हे विधिमंडळांनी संमत केलेले किंवा चर्चेस घेतलेले विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवण्याचा राज्यपालांना अधिकार देतात. राज्याच्या कक्षेतील विषयावरच केंद्राचे हे दडपण कशासाठी ? कलम २४९ नुसार राष्ट्रहिताच्या दृष्टिकोणातून घटक–यादीतील विषयावरही केंद्रास कायदा करता येतो. हे कशासाठी ? घटक सरकारातील सर्व मंडळी राष्ट्रद्रोही आणि तीच केंद्रात गेली की परमराष्ट्रवादी होतात काय ? नसेल तर मग 'माझे ते माझे आणि तुझेही माझे' हा न्याय कशासाठी ? हे सर्व बदलले पाहिजे, अशी त्या मसुद्याची मागणी. याशिवाय लोकसभेत लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व आहे. त्यामुळे अधिक लोकसंख्या असणाऱ्या प्रांतांना तेथे अधिक प्रतिनिधित्व मिळते व त्याचे लोकसभेत वर्चस्व प्रस्थापित होते. यामुळे सर्व घटकराज्यांच्या समानतेचे तत्त्व नष्ट होते. म्हणून राज्यसभेत सर्व घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व देऊन आणि दोन्ही गृहांना समान हक्क देऊन हा दोष घालवावा. यासाठी राज्यसभेची निवडणूक प्रत्यक्ष करावी. त्यासाठी घटनेचे कलम २४८ व कलम ३६८ मध्ये योग्य ते बदल करावेत. त्याचप्रमाणे परिशिष्ट सातमध्ये बदल करून उर्वरित सत्ता घटकराज्याकडे द्याव्यात आणि कलम २८० च्या (२), (३) आणि (३ अ) उपकलमांत बदल करावे.

### केंद्राची भूमिका

सध्याची घटनात्मक व्यवस्था योग्यच आहे. सध्याही घटकराज्यांना भरपूर अधिकार आहेत. त्यांचा योग्य वापर केल्यास त्यांना त्यांचे प्रश्न सोडवता येतील. राष्ट्रहिताच्या दृष्टीने राज्यपालास व राष्ट्रपतीस घटकराज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. स्वायत्ततेची ही मागणी राजकीय असून तिच्याकडे विशेष लक्ष देण्याचे कारण नाही. भारताची सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक भिन्नता लक्षात घेता देशाच्या ऐक्यासाठी आणि संरक्षणासाठी केंद्र प्रबळ असणे आवश्यक आहे, असे विचार जनता पक्षप्रमुख श्री. चंद्रशेखर यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत व्यक्त केले. पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी तर निःसंदिग्ध


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

शब्दात या प्रश्नावर राष्ट्रीय संवाद घेण्यासदेखील नकार दिला आहे. केंद्राची ही भूमिका वरील मागणीच्या अगदी दुसऱ्या टोकाची आहे व तितकीच ताठर आहे.

### या तणावातून निष्पन्न काय होणार ?

एकीकडे अवास्तव केंद्रसत्तेच्या भीतीतून जोमाने पुढे येणारी स्वायत्ततेची मागणी तर दुसरीकडे या प्रश्नावर संवादासही विरोध करणारी केंद्राची भूमिका अशी ओढाताणीची ही परिस्थिती आहे. यातून काय निष्पन्न होईल याचा निर्णय आजच देणे कठीण आहे. नुकतीच घडलेली एक समांतर घटना या संदर्भात आठवते. तेव्हाच्या पूर्वपाकिस्तानमध्ये शेख मुजिब आणि त्यांच्या नॅशनल आवामी पक्षाची आरंभास फक्त स्वायत्ततेची मागणी होती. पश्चिम पाकिस्तानचे वर्चस्व असलेल्या तेव्हाच्या पाकिस्तान सरकारने ती मान्य केली नाही. यानंतर झालेल्या निवडणुकीत मुजीबसाहेबांनी हा बंगालच्या स्वायत्ततेचा प्रश्न जनतेपुढे ठेवला. नॅशनल आवामी पक्षाचे बहुमत नॅशनल असेम्ब्लीत झाले. बंगालला नुसती स्वायत्तता देण्यास तयार नसलेल्या पश्चिम पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांवर संपूर्ण देशाची सत्ताच बंगाल्यांच्या स्वाधीन करण्याचा प्रसंग आला. त्यांनी ते नाकारले आणि लष्करी दडपण आणि अत्याचार सुरू केले. त्यांची कल्पना अशी की, लष्कराच्या भयंकर माऱ्यापुढे बंगाली नमतील; पण तसे घडले नाही. त्यांनी स्वतंत्र बांगला देशाची घोषणा केली आणि शेवटी भयंकर संग्राम देऊन देश मुक्त केला !

भारतातील स्वायत्ततेच्या मागणीचे स्वरूप आज तसे नाही हे बरोबर; पण कोणत्याही राजकीय आंदोलनाचे स्वरूप परिस्थितिसापेक्ष हळूहळू बदलत, विकसित होत जात असते. स्वायत्ततेच्या या मागणीवर चर्चा करण्याचे देखील नाकारले तर आपल्या आर्थिक व अन्य आघाडीवरील पराभवाचे खापरही सरकारे केंद्रावर फोडीत राहाणार. त्यामुळे लोकमत उत्तेजित आणि प्रक्षुब्ध होत राहणार आणि आज शासनांच्या पातळीवर चाललेला हा संघर्ष सडकेवर येणार. स्थानिक स्वातंत्र्याचा प्रश्न ज्वालाग्राही असतो. फुटीरतेचा प्रश्न त्याहीपेक्षा जास्त स्फोटक असतो. प्रश्न सडकेवर आला की तो केंद्रातील शासनाच्या आणि पक्षाच्या प्रतिष्ठेचा बनेल आणि त्यातून पेटलेला वणवा कोणत्या दिशेने भडकत जाईल हे तेव्हाच्या परिस्थितीवर अवलंबून राहील.

### या व्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग

या दुष्ट चक्राचा भेद करण्याचा एकच मार्ग आहे. चर्चेची दारे सतत उघडी ठेवून त्याद्वारे आपली भूमिका समजावून, पटवून देणे. त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करणे. त्यांच्या योग्य त्या मागण्या पूर्वग्रहविरहित खुल्या अंतःकरणाने स्वीकारून त्यानुसार घटनादुरुस्ती करणे, केंद्रातील जनता सरकारने या बिगरजनता सरकारांचा विश्वास संपादन करण्यावर बरेच यश अवलंबून राहाणार आहे. नुसतेच घटनेचे पावित्र्य, 'राष्ट्रीय एकात्मता' आणि फुटीरता वाढण्याच्या सबबी पुढे करीत बसण्यात अर्थ नाही. राजकीय जीवनात घटनेच्या पावित्र्याला महत्त्व असते; पण एका मर्यादेत. जेथे लोकभावनांचा व त्यांच्या जीवनाचा प्रश्न येतो तेथे त्यास प्राधान्य द्यावे लागते. परिवर्तन हेच जेव्हा मानवी जीवनाचे मूळ सूत्र आहे तेव्हा त्या जीवनाभोवती विणलेल्या, राष्ट्र, राज्य, घटना या कल्पना कशा स्थिर राहू शकतील ? तशी आपली राज्यघटना काही तेवढी पवित्र आणि परिवर्तनाने विटाळणारी नाही. आतापर्यंत तिच्यात आपणच अनेक परिवर्तने केली आहेत. शिवाय प्रश्नाच्या मुळाकडेच जावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, ही घटना बनविणारी आणि स्वीकारणारी घटनासमितीच प्रातिनिधिक नव्हती. त्यामुळे भारतीय जनतेच्या नावाने अपरिवर्तनीय घटना स्वीकारण्याचा किंवा जनतेवर ती लादण्याचा त्या समितीस अधिकारच नव्हता. लोकशाहीचा स्वीकार अर्धवट अंतःकरणाने करून चालत नाही. चर्चा, संवाद, वाटाघाटी, तडजोडी यातूनच लोकशाही संपन्न होते. या अर्थाने लवचिकता हा लोकशाहीचा गाभा. ताठरपणा हे हुकुमशाहीचे लक्षण. लोकशाही घटना आणि हुकुमशाही प्रवृत्ती या दोन परस्पर विरोधी गोष्टी एकत्र राहू शकत नाहीत. तेव्हा दुराग्रह सोडून लवचिक भूमिका आणि मनाचा समतोल ठेवून लोकशाही मार्गाने हा प्रश्न हाताळणे इष्ट होणार आहे. शिवाय जनता पक्षावर याबाबतीत विशेष जबाबदारी आहे. त्यांनी घटकांना अधिक स्वायत्तता देण्याचे अभिवचन दिलेले आहे. □

---

## चक्रमचक्री

पृष्ठ १० वरून

ज्योतिषी सांगत असत. ना. ह. आपटयांच्या कादंबऱ्यांतूनही हा विश्वास वारंवार व्यक्त होताना आढळतो.

हा विश्वास सर्वस्वी भाबडा होता, हे आता अनुभवाने सिद्ध झाले आहे; पण आपल्याच कोंडाळ्यात गुंगून गेलेल्या ब्राह्मणांना याची जाण नव्हती. त्यामुळे आपण समाजाला उपदेश करावा, आपले अनुभव आम जनतेला समजावून द्यावेत, 'शहाणे करूनि सोडावे सकल जन' अशी एक इर्ई त्या वेळच्या लिखाणात आढळते. या भाबडेपणाचे मला तरी आकर्षण आहे. त्या भाबडया वृत्तीतून निर्माण झालेल्या आणि आता क्वचितच आढळून येणाऱ्या लिखाणाचे 'जगात वागावे कसे ? आणि 'मी कारखानदार कसा झालो ?' हे दोन नमुने आहेत. म्हणून मला ते वाचावेसे वाटतात आणि त्यांचे लेखक वेलणकर यांच्याविषयी आपुलकीही वाटते.

वेलणकरांशी माझे कोणतेच संबंध नव्हते. मी त्यांना पाहिलेलेही नाही; पण माझी नि त्यांची ही एक भाबडी मैत्री आहे.

□

कथा

# निर्णय

प्रा. सौ. वत्सला म्हसकर

आज सकाळपासून सलीमाचे मन ठिकाणावर नव्हते. तिच्या मनाचा विलक्षण कोंडमारा होत होता. अधूनमधून ती गंभीर होई व विचारात मग्न होऊन जाई; तर कधी एकाच ठिकाणी काही वेळ निश्चल उभी राही.

तिच्या आजूबाजूच्या मैत्रिणींना सलीमाच्या वागणुकीतला बदल प्रकर्षाने जाणवत होता.

"ए सलीमा, उद्याच्या आपल्या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमाची आता जरा तालीम करू या ना!" असं तिच्या मैत्रिणी म्हणत तेव्हा, "हो हो करू या ना!" असं नुसतं म्हणून ती गप्प होई. उत्साहाने पुढे मात्र येत नव्हती. तिचे मन मरगळले होते. शरीर आंबल्यासारखे वाटत होते.

आपल्या मनातले गुपित कोणाजवळ तरी बोलावेसे तिला वाटत होते, पण कोणाशी बोलणार? बी. एड्. च्या अध्ययनासाठी वसतिगृहात राहात असलेल्या त्या विद्यार्थिनी होत्या. सहवासाने मैत्री झाली होती इतकेच! पण कोणाजवळ आपले मन उघडे करावे अशी जवळीक अद्याप निर्माण झालेली नव्हती.

एकटं बसून निवांतपणे विचार करणे अत्यावश्यक होते. शेवटी सलीमाने आपल्या मैत्रिणींना, "बरे वाटत नाहीए ग मला. डोकं जरा भणभणत आहे. मी जरा पडते माझ्या खोलीत!" असं म्हणून खोलीचा दरवाजा लोटून घेऊन पलंगावर अंग झोकून दिले.

पण तिच्या मनाला स्वस्थता नव्हती. वर्षभराच्या विविध घटना मनश्चक्षूंपुढून सरकत होत्या.

अहमद शेखशी तिचे लग्न ठरले त्या वेळी तिच्या आईवडिलांना केवढा आनंद झाला होता! तिलाही खूप प्रसन्नता वाटली होती.

अहमद तरतरीत होता. शिकलेला, श्रीमंत, आईवडिलांना एवढं पुरेसे होते. शासनाचा तो एक राजपत्रित अधिकारी होता ही तर त्यांच्या दृष्टीने मोठी अभिमानाची बाब होती.

लग्न ठरून महिना झाला नि सलीमा बी. एड्. च्या पदवी-परीक्षेच्या अध्ययनासाठी कोकणातील आपल्या आडगावातून रत्नागिरीच्या वसतिगृहात राहावयास गेली. तिच्या आई-वडिलांना व स्वतः सलीमाला शिक्षणाची आवड होती. अहमदला ही गोष्ट विशेष रुचली नाही. त्याने विशेष विरोध दर्शविला नाही, पण एवढेच म्हणाला, "बायकांनी जास्त शिकले पाहिजे असं नाही!"

सलीमा बुद्धिमान होती. तिच्या ठिकाणी नाटय, वक्तृत्व, क्रीडापटुत्व असे काही गुण होते. स्वाभाविकच विविध स्पर्धांतून ती भाग घेई व पारितोषिके पटकावी. आंतरमहाविद्यालयीन भाषणस्पर्धा महिन्यापूर्वीच झाली व त्यात सलीमाला प्रथम क्रमाङ्काचे पारितोषिक मिळाले.

वृत्तपत्रांतूनही ते वृत्त छापून आले. तिच्या प्राध्यापकांनी व इतरेजनांनी सलीमाची प्रशंसा केली.

हा सर्व वृत्तांत अहमदला ज्ञात व्हायला वेळ लागला नाही. कारण रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात त्याची नुकतीच नेमणूक झाली होती. सलीमाने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे कौतुक करणे किंवा अभिनंदन करणे दूरच राहिले; पण त्याला ही गोष्ट रुचली नाही. त्याच्यातील संकुचित धर्म जागा झाला. त्याने सलीमाच्या वडिलांना पत्राने कळविले की, "सलीमाने अशा कार्यक्रमात भाग घेऊ नये असे मला वाटते."

अहमदचे पत्र वाचल्यावर सलीमाचे अब्बाजान ताबोडतोब स्वतःची गाडी घेऊन तिच्या खोलीसमोर उपस्थित झाले. तिच्या समोर त्यांनी अहमदचे पत्र ठेवले. थोडा वेळ ते स्वस्थ बसून राहिले. नंतर त्यांनी समजुतीने तिला सांगितले, "त्याच्या सांगण्याप्रमाणे वाग. उगीच भांडण नको!" काही वेळाने तिचा प्रेमाने निरोप घेऊन ते गावी परतले.

त्या गोष्टीला आठ दिवस झाले होते. आकाशवाणीच्या कार्यक्रमाचा दिवस आधीच ठरला होता. तेव्हा तिच्यापुढे मोठा प्रश्न उपस्थित झाला होता की काय सांगावे ह्या सर्व मैत्रिणींना? आपल्या प्रिय भावी पतीच्या संकुचित सूचनेचे स्वागत करावे की दिलेला शब्द पाळून ऐन वेळी कार्यक्रमाचा विचका करू नये? ही तिच्या दृष्टीने कठीण समस्या सोडविणे तिला कठीण होऊन बसले होते.

बी. एड्.च्या वर्गात शिकत असताना तिला विविध विषयांचे ज्ञान मिळत होते. कर्तृत्वाला आव्हान करणाऱ्या किती तरी क्षेत्रांची तिला माहिती मिळाली होती. विवाहित झाल्यानंतरही ह्या क्षेत्रात आपल्याला वेळात वेळ काढून बरेच काही करता येईल असे ती मनात योजीत होती. मतिमंद बालकांच्या व बेघर बालकांच्या संस्थांना महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली तिने व इतर विद्यार्थीवर्गाने भेटी देऊन तेथील अडचणी, कामे समजावून घेतली होती. लोकसंख्या शिक्षणाची आपल्या समाजाला किती आवश्यकता आहे हे तिला पटलं होतं.

पण अहमदच्या पत्रातील सूचनेने सगळ्या कर्तृत्वाच्या वाटा अडविल्या गेल्या आहेत असं तिला स्पष्ट दिसत होतं. केवळ एका माणसाच्या इच्छेसाठी आपण आपल्या समाजाच्या प्रश्नांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करायचं का? इच्छा असून! जाण असून! तिला पुनः पुनः काही सुचत नव्हते. उमगत नव्हते.

शेवटी काही तरी निश्चय करून ती उठली. स्नानगृहात जाऊन तिने गार पाण्याने तोंड धुतले. पाण्याचे हबके डोळ्यांवर मारून घेतले. त्यामुळे तिला तरतरी वाटू लागली.

तोंड पुसून ती बाहेर आली. आपल्या

मैत्रिणींना बोलावून तिने आकाशवाणीवरील ठरलेल्या चर्चेच्या कार्यक्रमाची तालीम केली. सर्वांच्या मताने कोणी काय बोलायचे ते निश्चित केले.

ठरल्याप्रमाणे आकाशवाणीवरील कार्यक्रम झाला. तो फारच चांगला झाला. श्रोतृवर्गाकडून तसे अभिप्रायही आले.

सलीमा प्रसन्न होती. आपला अभ्यास व इतर वाचन तिने जोरात चालू केले.

आपल्या मनाशी विचारपूर्वक असा एक निर्णय तिने घेतला होता. त्यामुळेच ती निःशंकपणे व मोकळेपणाने वावरत होती.

त्यानंतर आठ दिवसांनी तिला तिच्या वडिलांचे पत्र आले. त्यांत तोच शिळा नि बुरसटलेला संदेश होता. तिच्या भावी पतीने तिचा तो आकाशवाणीवरील कार्यक्रम ऐकला होता आणि तिच्या वडिलांना कळविले होते, "मी मागील पत्रात जी सूचना आपल्याला केली होती ती आपण सलीमाच्या कानावर घातली नाहीत का? जर ती घातली असलीत तर तिने आकावाणीवरील चर्चेत भाग कसा घेतला? असं करणं मला तितकसं पसंत नाही."

वडिलांच्या पत्राबरोबरच असलेले अहमदचे पत्र सलीमाने स्वस्थ मनाने एक वेळा वाचले, दोन वेळा वाचले आणि मग सरळ अहमदला लिहिले—

आपण अब्बांना पाठविलेले पत्र अब्बांनी माझ्याकडे पाठविले, ते मी वाचले. मन घट्ट करून मी एक निश्चित निर्णय घेतला आहे की सध्या लग्न करायचे नाही. आपल्याला जशा काही गोष्टी पसंत नाहीत त्याप्रमाणे मलाही; आपण जे मला सांगता की हे करू नको ते करू नको—ही गोष्ट अजिबात पसंत नाही. चांगली—वाईट गोष्ट समजण्याइतपत जाण माझ्यात आली आहे. तेव्हा विचारांच्या संघर्षाची गोष्ट लक्षात घेऊन आताच दूर झालेले बरे! पुढे सांसारिक जीवनात अस्वास्थ्य नको!

आपल्याला योग्य अशी वधू लवकर मिळो ही शुभकामना!

—सलीमा

---

एक टिपण :

# कप : एक पुरे चहाचा

डॉ. यशवंत देशपांडे

दोन्ही बाजू आपल्या म्हणण्यावर अडून असतात. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असतात. वातावरण कसं 'चार्जड्' असतं! कोणत्याही क्षणी स्फोट होण्याची शक्यता असते. वादळापूर्वीची शांतता सर्वत्र पसरलेली असते!

अचानक दोन्ही बाजू जाहीर करतात!

आमचं भांडण चहाच्या पेल्यातलं वादळ होतं!

चहाच्या पेल्याचं सामर्थ्य असं अचाट आहे! चहाचा एक कप शत्रूंना मित्र बनवितो. दिलजमाई घडवून आणतो, तर तोच चहाचा 'साधा कप' दिला नाही म्हणून जवळची माणसं दुरावतात. सहा-सहा तास चाललेलं कठीण ऑपरेशन यशस्वीरीत्या संपवून घरी परतलेल्या सर्जनला श्रमपरिहारासाठी हवा असतो चहाचा एक कप! अडीच तास 'रंगलेला पाच सेट्समध्ये गेलेला सामना जिंकून आलेला टेनिसपटू चहाच्या कपाकडे धाव घेतो. रंगभूमि गाजविणाऱ्या नाट्याचार्यांबद्दल तर बोलायलाच नको! त्यांचं तर चहाशिवाय पानही हलत नाही! (खरंच आहे. चहा झाल्यावरच पानाचा बार भरता येतो.) कवी, लेखक आणि चहा यांचे संबंध तर प्रसिद्धच आहेत. प्रतिभा प्रसन्न होण्यासाठी चहाचा नैवेद्य लागतो. एवढंच काय, आपल्या मुद्देसूद भाषणांनी संयुक्तमहाराष्ट्र गाजवून सोडणाऱ्या कृष्णमेननासारख्या मुत्सद्द्याचं चहाशिवाय विलक्षण अडतं. सत्तरसत्तर कप चहा पोटात ढकलल्याशिवाय त्यांना मुद्देच सुचत नाहीत!

असा आहे चहाचा कप! सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी!

चहा आहे म्हणून जीवनात चैतन्य आहे! सकाळी उठल्यानंतर चहा मिळणार नाही ही कल्पना सुद्धा भयानक आहे! चहा आहे म्हणून सकाळी उठणं आहे. मला हवेहवेसे वाटणारे दोन आवाज सकाळी सातच्या सुमारास कानांवर येतात. एक बांगड्यांचा आणि दुसरा कपबशांचा! बायको सकाळीच उठून चहाच्या तयारीला लागलेली असते. दोन्ही आवाज एकमेकांत असे बेमालूम मिसळून गेलेले असतात की, जणु दुधात साखर! (त्या वेळी खरोखरच दुधात नाही तरी चहात साखर पडत असते.) परंतु त्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या आवाजांचं सुख फार वेळ उपभोगता येत नाही. प्रादेशिक बातम्या सुरू होतात! त्या बंद करण्यासाठी उठावंच लागतं! मग प्रत्यक्ष चहा येतो! विलक्षण तरतरी वाटते. दिवसभराच्या अडचणींना तोंड द्यायचा हुरूप येतो, 'आज' आपला नसला तरी 'उद्या' मात्र आपला आहे हा विश्वास न कळत मनात शिरतो. स्वर्गीच्या देवांना चिरंजीवनासाठी अमृत प्रत्यक्ष प्यावं लागलं. चहाच्या नुसत्या कल्पनेनं देखील जीवन रसाळ बनतं. खरोखर, चहा आपल्या भोवती वावरतो, तोच मुळी अनेक रूपं धारण करून! स्पेशल,

साधा, चालू, मिक्स, गोल्डन, केटी ! अशी त्याची विविध रूपं ! भाषा बारा कोसांवर बदलते, चहा घराघरांतून बदलतो. एका गावच्या चहाची चव दुसऱ्या गावच्या चहाला नसते. स्थळाप्रमाणेच चहानं काळाचंही भान ठेवलं आहे. जेव्हा 'संगम' तुफान चालत होता, तेव्हा अनेक हॉटेलांतून 'संगम' मिळत असे. तोच 'संगम' काही वर्षांनंतर 'बॉबी' झाला. पन्नास-पंचावन्न साली हा 'संगम' किंवा 'बॉबी' नक्कीच 'अनारकली' असावा. 'तीन अनारकली लाव' अशा ऑर्डर्स त्या वेळी हॉटेलातल्या पोरांनी घेतल्या असतील ! अशा स्थळकाळाप्रमाणं बदलणाऱ्या चहानं काही अपवाद मागे सोडले आहेत. इराण्याकडचा चहा कधी बदलल्याचं ऐकिवात नाही ! तो बदलला असेल तर वेगळ्या कारणानं. इराणी जाऊन तिथे उडपी आलेला असतो ! इराण्याकडच्या चहाला बदलण्याची ही एक तरी संधी असते. रेल्वेस्टेशनवरच्या आणि फलाटांवरच्या चहाच्या तेवढं देखील नशिबात नसतं ! तो अक्षरशः निर्वासित झालेला असतो. खुद्द रेल्वेमध्ये केवढे बदल झाले ! किती तरी सोयी(!) झाल्या ! थर्डक्लासची जागा सेकंडक्लासनं घेतली ('गरिबी हटाव' च्या दृष्टीनं एक पाऊल पुढं पडलं.) विद्युतीकरण झालं. एवढंच काय, रेल्वेमंत्री सुद्धा दुसऱ्या पक्षाचे आले !

रेल्वेस्टेशनवरचा चहा नाही बदलला !

पाश्चिमात्य देशांमध्ये जुन्या दारूला अतिशय महत्त्व आहे. दारू जेवढी जुनी तेवढीच ती मौल्यवान ! शंभर, दीडशे, दोनशे, वर्षांपूर्वीची दारू, आनंदाचे प्रसंग साजरे करायला बाहेर येते. रेल्वेचा प्रवास म्हणजे आपल्याकडे आनंदाचा केवढा सोहळा ! त्यासाठी तेवढाच जुना चहा पण आपल्याला निरोप द्यायला फलाटावर येतो. आज आपल्या भारतात रेल्वेफलटांवर 1853 सालचा चहा मिळतो ! त्याच साली ठाणे-मुंबई मार्गावर भारतातली पहिली आगगाडी धावली होती ना !

चहानं आपलं एक वैशिष्ट्य कायम ठेवलं आहे ! तो फितुर झाला नाही ! इंग्रज इथे आले. त्यांचा स्वभाव थंड ! थंडीची आणि थंड वस्तूंची त्यांना भारी आवड ! कॉफी त्यांनी 'कोल्ड' करून टाकली. चहा मात्र त्यांना वश झाला नाही. तो आजतागायत 'गरमच' राहिला आहे ! मग इंग्रजांनीही त्याच्याशी मिळतं घेतलं. त्याचा 'गरमपणा' टिकविण्यासाठी त्यांनी मग 'थर्मास' सुद्धा बनविला!

एवढासा चहाचा कप ! मुलखाचं शहाणपण शिकवून जातो !

थोडसं डिकॉक्शन, माफक साखर आणि भरपूर दूध घालून चहा पिणारा माणूस सुखात लोळणारा असतो. दुःखाचा त्याला स्पर्शही झालेला नसतो ! त्याचं बालपण कोडकौतुक करून घेण्यात गेलेलं असतं. मोठं झाल्यावर त्याला हव्या त्या गोष्टी फारसे परिश्रम न करता मिळालेल्या असतात. त्याला वाईट नाद नसतात. तो निर्व्यसनी असतो. एकंदरीत तो एक चांगला माणूस असतो !

या उलट खूप कडक चहा पिणारा माणूस तामसी असतो. लहानपणी त्याला फारसे प्रेम मिळालेलं नसतं. त्याचा स्वभाव मनस्वी असतो. चमचमीत खाण्याची त्याला आवड असते आणि अर्थातच त्यामुळे त्याला पोटाचे काही विकार असतात !

चहामध्ये 'कॅफिन' आणि 'टॅनिन'चं प्रमाण पाहून चहा घेणारा माणूस अतिशय 'मेटिक्युलस' असतो. सुपारी, तीमध्ये असलेल्या 'ॲरिकोलिन' मुळे लागते हें त्याला ठाऊक असतं. लहानपणी मुलांना चहा अवश्य द्यावा. कारण त्यामुळं दातांची 'फ्लोराइड रिक्वायरमेंट' 'फुलफिल' होते असं त्याचं म्हणणं असतं. नियमितपणे पालेभाज्या खायला हव्यात, असंही त्याचं मत असतं. आठवड्यातून तीन वेळा न चुकता तो उसळ खातो. शरीराला किती कॅलरीज हव्या आहेत हे त्याला बरोबर ठाऊक असतं !

बिनसाखरेचा किंवा 'सॅकरिन' घालून चहा घेणारा माणूस मधुमेहाचा रोगी आहे हे काय सांगायला हवं ? ते आजकाल लहान मुलांनाही माहीत असतं. असा माणूस लौकर चिडणारा असून त्याला दवाखान्यात 'रेग्युलर चेक अप'साठी जावं लागतं. भात, बटाटा इत्यादी 'स्टार्च व कार्बोहायड्रेट रिच' पदार्थ त्याला वर्ज्य असतात !

आणि आमच्यासारखी 'कडक मीठा' पिणारी माणसं ! त्यांना जणु स्वतःचं मतच नसतं. त्यांना कोणीही 'इन्फ्लुएन्स' करू शकतं. त्यांना कुठलाही रोग नसतो ! त्यांचं कुणाशीही भांडण नसतं ! ते चांगले दीर्घायुषी असतात !

असं आहे हे चहापुराण !

आपल्या आयुष्यात ते केव्हा सुरू होतं हे समजत नाही. माझ्या आयुष्यात चहा केव्हा आला हे मला मुळीच आठवत नाही. इतक्या हळुवारपणे तो आला. माझ्या आयुष्यातून चहा केव्हा जाणार हे मात्र मी नक्की सांगू शकतो !

माझ्या आयुष्यातून चहा जाईल, तेव्हा माझे सर्व आप्त, नातलग, मित्र जमतील. सर्वांच्या हातात चहाचा कप असेल. मधूनच कोणी तरी म्हणेल, 'त्या मानानं लौकरच गेला !' मग एक दीर्घ सुस्कारा सोडून सर्वजण चहाचा कप तोंडाला लावतील !

दुःख बुडवायला सुद्धा शेवटी चहाच लागतो ! □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

पुस्तके

# अवर लेडी ऑफ द फ्लॉवर्स

## जीन जेनेट

### एक अनोखा अध्यात्मिक अनुभव

प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी

मानवप्राणी आकाराने जगभर फारसा सारखा नाही, त्याचप्रमाणे फारसा विभिन्न नाही; परंतु या माणसाने जगभर जी वेगवेगळी संस्कृतिनामक जीवनपद्धती स्वीकारली आहे ती सहस्राक्ष मोराच्या पिसाऱ्यानेही मोजता येऊ नये. मानवाच्या मूलभूत गरजांपैकी अत्यंत तामसी अशी जी लैंगिक गरज आहे, तिची नाना रूपे–विरूपे संस्कृतिगणिक आढळतात. प्रस्तुत लेखकाने भारतीय स्त्रियात 'लेस्वियन' समलिंगी संबंध हुडकण्याचा–कानोसा घेण्याचा–प्रयत्न केला असता, त्याला एक तर कुणाला काही माहिती नसल्याचे आढळले, नाही तर हे काय भलतेच ? असे शहाजोग प्रश्नार्थक उत्तर मिळवून गप्प बसावे लागते. साहित्यातली दुर्बोधता व अश्लीलता या तथाकथित गोष्टी आपण पश्चिमेतून आयात केल्या असे सांगितले जाते. खरेही असेल ते; परंतु मानवी जीवन एकाच वेळी अथांग आणि अधःपतित, उथळ आणि आध्यात्मिक असे असू शकते. माणसाच्या भंकस भरडपणाचा विच्छिन्न करणारा अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषेचे माध्यमही मग तसेच आपोआप यावे लागते. पाश्चात्य माणसाला जे अनुभव येतात ते आम्हालाही येतात, फक्त त्याचा बेछूटपणा व्यक्त करण्यासाठी आमच्याजवळ एक तर प्रामाणिक शब्द नसतात आणि दुसरे म्हणजे ते वाचायला 'सहानुभूतीदार' वाचक नसतात.

जीन जेनेटची 'अवर लेडी ऑफ फ्लॉवर्स' ही ज्याँ पॉल सार्त्रने पुरस्कारिलेली कादंबरी शीर्षकावरून काही तरी रोमँटिक असावी असे वाटते; पण जर ही कादंबरी रोमँटिक म्हणायची तर तो 'रोमान्स' नरकातला–नरकयातना देणारा आहे. ही फ्रेंच कादंबरी फ्रान्समध्ये देखील 'भूमिगत' होती हे वाचून आश्चर्य वाटते. फ्रान्सइतके कलाक्षेत्रातले स्वातंत्र्य दुसऱ्या कुठेही नसेल ! 'अवर लेडी'च्या जाहिरातीत अमेरिकन भडकपणा भरपूर प्रमाणात आहे. समलिंगी संभोग, गुन्हेगारी, विकृती, धार्मिक, नास्तिक, स्फोटक, प्रामाणिक, स्किझोफ्रेनिक एवंगुणविशिष्ट अशी ही 'लेडी' आहे. विसाव्या शतकातील प्रतिभावंतांच्या प्रभावळीत जेनेट ( गेनेट ? ) बसला आहे. फ्रान्समध्ये लेखक-गुन्हेगारांची एक श्रेष्ठ परंपरा आहे. (गांधी, विनोबा, नेहरू, सानेगुरुजी, सावरकर व आता जे. पी. सोल्झेनित्झिन यांनी तुरुंगात लिखाण केले; परंतु त्यांच्या लिखाणाची व तुरुंगवासाची जातही वेगळी व लिखाणाचा रगही वेगळा ! ) जेनेट हा व्हीलाँ, रिम्बाँ, हेन्री शॅरियर ( 'माणूस' फेम ) यांच्या जातीचा गुन्हेगारही व लेखकही होता. तिकडे एवढी प्रतिभावंत माणसे गुन्हेगार कशी होऊ शकतात ? किंवा गुन्हेगार एवढे प्रतिभावंत कसे असतात ? अनुभवांना आकार देण्याची क्षमता गुन्हेगारांत असणे हादेखील त्या संस्कृतीचा गौरवच होय. जेनेट हा समलिंगसंभोगी व चोर होता. प्राचीन ग्रीसपासून ते आजच्या अमेरिकेपर्यंत 'होमो' संबंध हे गोऱ्या संस्कृतीत अविभाज्य स्वरूपाचे संबंध असल्याचे दिसते. कदाचित असेही असावे की मानवी लैंगिक संबंधातील नवे नवे ( की जुनेच ! ) प्रयोग–शोध घेण्याची ही प्रवृत्ती देखील कलावंतांना पोषक ठरत असावी. त्या मानाने आधुनिक काळात आपल्या कलावंतांवर 'असली' बंधने अधिक आहेत.

युरोपमधल्या बहुतेक तुरुंगांचा पाहुणचार जेनेटने घेतला होता, एकट्या फ्रान्समध्येच त्याला दहा वेळा तुरुंगवास लाभला. शेवटी जेव्हा त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली तेव्हा फ्रान्समधल्या ज्येष्ठ लेखकांनी सरकारकडे अर्जविनंत्या करून ती शिक्षा माफ करण्यासाठी दडपण आणले. ( याउलट नुकत्याच पार पाडलेल्या अनुशासनपर्वात भारतीय लेखकांनी काय केले ? ) कलावंत अनुभव घेण्याच्या क्षेत्रातले स्वातंत्र्य जोपर्यंत संपूर्णपणे 'उपभोगत' नाही, तोपर्यन्त त्याचे सारे 'थिटे'च असते. कुणाला रागही येईल; परंतु लैंगिक क्षेत्रातली खरी 'मुक्ती' हीच माणसाच्या अखेरच्या मुक्तीचे व एकूण सर्वच मुक्तींचे साधन असते ! अशा बदमाश, बदफैली प्रतिभावंताच्या कादंबरीला प्रस्तावना आहे सार्त्रची–ज्याने नोबेल प्राईझ नाकारण्याची हिम्मत दाखविली होती. ( कलावंत अशा अर्थाने 'मस्त' असावेत. )

'अवर लेडी ऑफ फ्लॉवर्स' कशीही असली तरी ती अश्लील नाही. जरी पानोपानी शारीरिक संबंधांची वर्णने, कधीकधी गलिच्छ वर्णने – आढळतात तरी. 'अवर लेडी' ही स्त्री नाही, तो 'पुरुष' आहे. समलिंगी संभोगाचा चाहता. ही कादंबरी तुरुंगवासात – एकान्तात लिहिली गेली. एकान्ताचे कितीही गोडवे गाइले गेले तरी सक्तीचा एकान्त हा एक भेदक अनुभव आहे. अर्थात् या एकाकी एकान्तात तळाच्या गोष्टी

[ अवर लेडी ऑफ द फ्लावर्स, जीन जेनेट, बॅंटम प्रकाशन, सहावी आवृत्ती १९६४, मूल्य रु. दहा. ]

वर येण्यास मदत होते हेही खरेच. ही कादंबरी 'अँबीग्युअर्स' या अर्थाने दुर्बोध आहे. कादंबरीला विषय तो, ती वा त्रिकोण असा काही नाही. संपूर्ण कादंबरीभर 'फेटॅलिटी' अपरिहार्य दुर्दैवता' व्यापून उठल्यासारखी आहे. आपल्या वाचकांना जी गोष्ट हवी असते, ती या कादंबरीला नाही. नाही तरी मानवी जीवन गोष्टीसारखे हुबा नसतेच — ते विलक्षण काही तरी असते 'अवर लेडी'चे वाचन हा विलक्षण अनुभव जरूर आहे. तुरुंगात कैद्यांना काम — सक्त काम—देण्याची प्रथा इतरांप्रमाणे फ्रांसमध्येही आहे. जेनेटला कागदी पिशव्या करण्याचे काम दिले होते. जेनेटने ही कादंबरी त्या ब्राउन पेपरवर लिहिली. अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर हस्तलिखित दोनदा जाळण्यात आले. जेनेटने ती पुन्हापुन्हा लिहिली. कुणासाठी? कशासाठी?

अवर लेडीच्या वाचनाने वाचकांचा थरकाप होतो. त्यातले शब्द कैद्याचे आहेत. आवेगाने उच्चारलेले— स्वतःला बुडवून टाकण्यासाठी, स्वतःत भरलेल्या दगडांसारखे टणक— थंड. 'अवर लेडी'मध्ये जेनेटच्या स्मरणसाखळीतले मणी हे लैंगिक अनुबंधांचे आहेत. 'युलिसिस' या कादंबरीपेक्षाही लेखकाशी शारीरिक साहचर्य गाठून, गोठवून टाकणारी अशी ही 'अवर लेडी' आहे. वाचताना लेखकाच्या 'गंधाने' वाचकाच्या नाकपुड्या थरथरू—फुरफुरू लागतात. या कादंबरीत डार्लिंग, अवर लेडी, ग्रॅबियल, डिव्हाइन, गॉर्वी असे पात्रांचे पंचायतन आहे. या पाच पात्रांच्या आठवणीने जेनेटची होणारी उलघाल, त्यांच्या हालचाली, त्यांच्या आठवणी हा या कादंबरीचा विषय आहे असे म्हणता येईल. त्यांच्या आठवणीने त्याच्यातील लैंगिक प्रेरणा पेटून उठतात. ही पाच पात्रे एवढी जिवंत होतात की, जेनेटला शारीरिक पातळीवर अस्वस्थ करून सोडतात. जेनेटने एकदा सार्त्रला सांगितले होते, 'माझी पुस्तके कादंबऱ्या नाहीत. कारण त्यातील पात्रे स्वतः कुठलाच निर्णय घेत नाहीत.' म्हणून तर सारी कादंबरी वैराण वाळवंटासारखी वाटू लागते. 'अवर लेडी' हे जेनेटला पडलेले साहित्यस्वप्न आहे. कुठल्याच बऱ्यावाईट अर्थाने नव्हे तर केवळ स्वप्न या अर्थानेच! मात्र या स्वप्नातच जेनेटची जागृती अंतर्भूत आहे. कसले अचाट स्वप्न!

याअगोदर कादंबरीच्या लैंगिक विशेषणांची चळत आपण पाहिलीच. 'मॅस्टरबेशन' (ओनॅनिस्ट-प्रवृत्ती) असो की समसंभोग असो, तो शरीर-पातळीवर जाणवावा असा भेदक आहे एकेक प्रसंग. वाचकाचाही लेखकाबरोबर ऊर धपापूस जावा! जेनेटच्या बाबतीत लिखाण हा एक 'इरॉटिक डिव्हाइस' बनून जातो. कादंबरी वाचकांना उद्देशून चालत नाही. तिचे साध्य-साधन आहे जेनेट एके जेनेट! मानसशास्त्रीय परिभाषेत 'अवर लेडी' ही एक कंट्रोल्ड वेकिंग ड्रीम' स्वरूपाची कादंबरी बनते.

सुटेसुटे भाग तपासायला लागलो तर काही भाग वाचतांना बिचाऱ्या काही वाचकांना ठसका लागेल, तर काही भागांचा काव्यात्मपणा खरोखर जिवाला चटका लावील असा आहे. आपण दैवाधीन (प्रॉव्हिडेंस) आहोत, याची जाणीव जेनेटला व्यापून उरलेली आहे. संपूर्ण कादंबरीभर भाबड्या वाचकांना जे मजकूर हवे असतात किंवा 'लूज एन्ड्स्' नको असतात ते नेमके नाहीत व आहेत. जेनेट विस्ताराने सांगत वा रंगवत नाही. स्वप्न कसे रंगविता येईल? ते पडते तसे पडते, आपल्या हाती थोडेच असते? तंद्रीतल्या किंवा समाधिस्थ दैवी व्यक्तीप्रमाणे तो आपल्या कल्पनेचे विश्व व त्यात वस्ती करणारी माणसे (म्हणजे तीसुद्धा जेनेटच्या संदर्भात) निर्माण करून ठेवतो. म्हणून तर त्याने निर्माण केलेली पात्रे एकाच वेळी फिकट व दिपविणारी, उद्दाम तेवढीच शरण वाटतात. कलावंत हा परमेश्वरासारखा असला तरी त्याला माणसे निर्माण 'करावीच' लागतात. सबंध कादंबरी ही अखेरीस न सांगता येण्यासारख्या स्वप्नासारखी, तरीही चांगली २५० पृष्ठे सांगितली जाते. कलावंताला जे वाटते ते व्यक्त करण्याशिवाय पर्यायच उरत नसावा. कलावंताचा हा सच्चेपणा की कच्चेपणा? ही कादंबरी शेवटी उरते ती एक साधन म्हणून. दळणवळणाचे साधन— लेखक ते वाचक हे ते दळणवळण. एकांतात केलेले हे शब्दमैथुन अखेर वाचकांपर्यंत पोचते होतेच. (मराठीत लिहिताना काही गोष्टी मला देखील स्पष्टपणे लिहिता येत नाहीत. हा दोष माझ्यासारख्या एकट्या—दुकट्या माणसाचा नाही, तर आपण निर्माण केलेल्या नियम-नियमनांच्या चौकटीचा आहे. त्यालाच आपण संस्कृति म्हणू शकतो.)

कादंबरी तुरुंगात घडते, असे म्हणण्याऐवजी ती जेनेटमध्ये घडते असे म्हणणे अधिक योग्य होईल आणि मग शरीरात जेवढे मल-मलीन आहे ते 'अवर लेडी'च्या पानोपानी पसरते. तरी देखील कादंबरी संपवून खाली ठेवल्यानंतर मन घाणीने लडबडल्यासारखे वाटत नाही. काही तरी शब्दातीत— शरीर तेवढाच अशारीरिक अनुभव घेतल्यासारखे वाटू लागते. एका लेखक-गुन्हेगाराने लिहिलेली कादंबरी वाचकाला विशेषतः आपल्यासारख्या, एका नव्या दिशेने नव्या दुनियेत घेऊन जाते. ह्या सर्व जाणिवा व्यक्त करण्यासाठी जेनेटला समृद्ध फ्रेंच भाषेतली २५० पृष्ठे अपुरी पडली, तर आपल्यासारख्या वेगळ्या, विषम उबविलेल्या वातावरणातल्या वाचकांना काय वाटते ते सांगायला केवढ्या कमतरता-मर्यादा जाणवतील? जेनेटने ही कादंबरी कुणा मॉरिसच्या मृत्यूच्या सलणाऱ्या स्मृतीसाठी लिहिली आहे. वाचकही तो अनुभव घेतात, हेच या लेडीचे यश! □

हत्याकांड होऊनही जो संयम दाखविला तो वाखाणण्यासारखाच आहे !

या लाजिरवाण्या आणि जुलमी प्रकाराची चौकशी होणे अपरिहार्य आहे आणि तशी ती या प्रकाराचीही होईलच; पण केवळ चौकशी झाली आणि त्यातून काही अपराधी मंडळींना शिक्षा झाली तरी हे प्रकरण कायमचे मिटणार नाही. कामगारांच्या न्याय्य चळवळीबद्दल ज्याला आस्था आहे अशा कोणाही सहृदय माणसाच्या मनात हे प्रकरण कायमचे घर करून बसले आहे आणि पाच–सात वर्षांनंतरही जर या पंतनगरला भेट देण्याची वेळ आली तर आपल्याच माणसांनी आपल्याच माणसांवर केलेल्या या मस्तवाल गोळिबाराच्या पुसटत्या खुणा खचित अस्वस्थ करून सोडतील ! ◻

## असे ऐकिवात आहे की –

◻ ◻ काय वाटेल ते करून आज दि. ७ मे रोजी होत असलेली आझमगढची लोकसभा–निवडणूक जिंकण्याचा चंग इंदिरा गांधी यांनी बांधला आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी त्यांच्या पक्षाने पाण्यासारखा पैसा खर्च करण्यास प्रारंभ केला असून निवडणुकीतील राजकीय डावपेच लढविण्याची सारी जबाबदारी इंदिराजींनी स्वतःच्या शिरावर घेतली आहे. काँग्रेसच्या इंद्रजित यादव यांची उमेदवारी घोषित होताच प्रारंभी या जागेसाठी इंदिराजी एका स्थानिक प्रभावी ठाकुराला तिकिट देणार होत्या. ठाकुर रामकुवर सिंग हे अलीकडेच काँग्रेसकडून इंदिरा काँग्रेसकडे आले. त्यांच्या या पक्षबदलाचे लगोलग पारितोषिक देण्यात येणार होते. तथापी चंद्रजित यादव यांची मुसलमानांमधील लोकप्रियता लक्षात घेऊन त्यांनी मीर कासीम यांनी ही निवडणूक लढवावी असा आग्रह धरला आणि त्यांनी नकार दिल्यावर उत्तरप्रदेश इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा माहसिना किडवाई यांची बाईंनी निवड केली. आज मतदारसंघात होणाऱ्या मतदानाचे निकाल कसे लागतात यावर अनेक महत्त्वाच्या राजकीय गोष्टींचे निर्णय ठरणार आहेत.

◻ ◻ महाराष्ट्रामधील काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांचे संयुक्त सरकार रहाणार की नाही, याबद्दलच्या बातम्यांना पेव फुटले असून खास आतल्या गोटातल्या वार्ता रोज प्रसिद्ध होत आहेत. असे सांगतात की, आपल्याला डावलून जर दिल्लीमध्ये काँग्रेसने जनता पक्षाबरोबर वाटाघाटी सुरू केल्या, तर आज आघाडीचे असलेले सरकार आपण केवळ इंदिरा काँग्रेसचे करून दाखवू अशी धमकी काही जबाबदार मंत्र्यांनी दिली आहे. शरद पवार यांचा गट जर काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांची आघाडी मोडून बाहेर पडला तर त्याला बाहेरून पाठिंबा देण्याची दिल्लीतील जनता पक्षाच्या नेत्यांनी तयारी दाखविली असली तरी महाराष्ट्रामधील जनता पक्षाच्या नेत्यांना हा विचार मानवणारा नाही. प्रादेशिक नेत्यांना बाजूला ठेवून, वरच्यावर चर्चा करून महाराष्ट्रामधील आघाडीचे सरकार पाडण्याचे प्रयत्न जसे चालू आहेत त्याचप्रमाणे दिल्लीमधील नेत्यांना दूर ठेवून प्रादेशिक पातळीवर काही वेगळे राजकारण जोरात शिजत आहे. दिल्लीमधील नेत्यांना दिल्लीतच ठेवून जर महाराष्ट्र काँग्रेसला मोठे खिंडार पाडता आले तर प्रादेशिक पातळीवरही हा प्रश्न सोडविला जाण्याची शक्यता आहे. देवराज अरस हे या दृष्टीने विशेष प्रयत्नशील असून यशवंतरावांना डावलून इतर नेत्यांशी परस्पर मेतकूट जमवून यशवंतरावांना कायमचा शह देण्याचा त्यांनी जोरदार प्रयत्न चालविला आहे. शरद पवारही त्यांच्याबरोबर संपर्क साधून आहेत. फोडाफोडीचे हे असे राजकारण चारही बाजूंनी खदखदत असताना शरद पवार दिल्लीत जाऊन पत्रकारांना सांगतात की, आघाडीचे सरकार कोसळेल अशा भ्रमात कोणी राहू नये ! इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस बुटासिंगही आघाडी सरकारची प्रकृती निकोप असल्याची ग्वाही देतात. मंत्रिमंडळविस्ताराचे मधाचे बोट लावून वसंतदादा आमदारांना पकडून ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. मंत्रिमंडळाच्या सुस्थिरतेची बाहेरून कितीही ग्वाही देण्यात आली असली तरी 'रात्र वैऱ्याची आहे !' असे समजून सर्व मंत्री विशेषतः मुख्यमंत्री वसंतदादा राजकारणाची सावध चाल खेळत आहेत.

◻ ◻ जनता पक्षामध्ये जरा कुठे स्थिरस्थावर झाल्यासारखे वाटू लागले की काही तरी नवीनच संकट आ वासून उभे राहते. आता नानाजी देशमुखांची नवी घोषणा पहा ना–त्यांनी सांगून टाकले, साठ वर्षांवरील नेत्यांनी सत्तास्थानांपासून दूर होऊन विधायक कार्याला वाहून घ्यावे. त्यांची घोषणा झाली आणि दुसऱ्या दिवशी चरणसिंग हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. पंतप्रधानांनी प्रतिक्रिया अद्यापी व्यक्त केली नसली तरी ते मनातून अस्वस्थ झाले असणार ही उघड गोष्ट आहे. बाबुजींनी ही सूचना हसण्यावारी नेली असली तरी पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनी या सूचनेचे स्वागत केले आहे. नानाजी संघाच्या ज्येष्ठ नेत्यांचे विचार राजकीय व्यासपीठावरून व्यक्त करतात असे म्हणणाऱ्या राजकीय निरीक्षकांची सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी पूर्ण गोची केली आहे. नानाजींची सूचना आपल्याला अजिबात मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. ही सूचना अन्य कोणी करते तर गोष्ट वेगळी होती; परंतु जनता पक्षामध्ये ज्यांचे स्थान असाधारण महत्त्वाचे आहे, ज्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात देण्यात येत असलेले मंत्रिपद नाकारून पक्षबांधणीचे काम राजीखुषी स्वीकारले त्या नानाजी देशमुख यांनी ही सूचना केली असल्याने त्याला महत्त्व आले आहे. नानाजींकडे अजूनही लोक संघी–जनसंघी म्हणूनच बघतात. त्यामुळे इंदिरा काँग्रेसचे शंकरानंद यांनी सांगून टाकले की, ही सूचना जनसंघाला वाट मोकळी करून देण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. ही सूचना केवळ चर्चेसाठी आहे आणि ती चर्चेच्या पातळीवरच विरून जाईल. आज तरी मोरारजी–बाबुजी–आणि चौधरी चरणसिंग या त्रिकूटाविरुद्ध त्यांच्या वाढत्या वयाच्या आधाराची शिडी घेऊन काही राजकारण करता येण्यासारखी स्थिती नाही. यांपैकी कोणी आपण होऊन निवृत्त झाला तर गोष्ट वेगळी; पण नानाजींच्या सूचनेप्रमाणे एखादी योजना तयार करून ती राबविण्याची ताकद जनता पक्षामध्ये नाही आणि अट्टाहासाने अशी काही योजना राबविण्याचा प्रयत्न झालाच तर ती राबविण्याचे धाडस करणाऱ्याच्या पदरी हसे येईल, आणि पक्षांतर्गत यादवीचा आगडोंब उसळून पक्षाची वाताहत होईल ! ◻

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ २ वरून

यांनी संघावर 'सोबत'मध्ये लेखमाला लिहिली होती. (जिज्ञासूंना ते अंक मी दाखवू शकेन.) तर त्यात असे लिहिले होते की, संघाच्या पदाधिकाऱ्यांना, प्रमुखांना स्वा. सावरकरांचा प्रभाव संघस्वयंसेवकांवर पडू नये असे वाटत असल्याने त्यांनी हेडगेवारांच्या चरित्रातील स्वातंत्र्यवीरांच्या ज्येष्ठ बंधूंचे उल्लेखदेखील कापले.

अधिक-उणा शब्द गेला असेल तर क्षमा असावी. काय सांगायचे आहे ते जाणून घेण्याचा आपण प्रयत्न कराल हा आपणासंबंधी विश्वास आहे. आतापर्यंतच्या 'माणूस'च्या अनुभवावरच तो आधारलेला आहे.

१७ एप्रिल **हेमंत बाळकृष्ण गोळे,** थेऊर

## 'झोत' प्रतिक्रियेची प्रतिक्रिया

प्रा. शाम अकोलकर

श्री. श्री. ग. माजगावकर यांस स. न.

१५ एप्रिल '७८ च्या अंकातील 'झोत' दोन प्रतिक्रिया' वाचल्या. त्यांपैकी श्रीमान विनय गुणे, संगमनेर, यांची प्रतिक्रिया वाचून काही वाटले, ते लिहितो आहे.

श्रीमान विनय गुणे यांनी आपल्या प्रतिक्रियेत एक अनुभव सांगितला तो असा. 'ज्या वेळेला सत्याग्रहाची योजना झाली तेव्हा अगदी संभाव्य सत्याग्रहींना ह्यामागची भूमिका सांगायचो. शंकांचं निराकरण करायचो. एका 'सेवादलाच्या सैनिकाला सत्याग्रहाविषयी विचारले. त्यांनी आम्हाला सुनावले, – हे सगळं ठीक असलं तरी माणसानं आपला स्वार्थ बघायचा असतो. मला 'युवक कॉंग्रेस'चे सेक्रेटरी करतायेत, कशाला सोडायचा हा चान्स! हे लिहिणे म्हणजे गुणे यांचा सेवादलाविषयीचा खोडसाळपणा किंवा आकसच म्हणावा लागेल.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की, सेवादल सैनिकांना सत्याग्रहाची भूमिकाच मान्य असल्यामुळे लोकशाहीचे 'सत्याग्रह', आंदोलने, मोर्चे, हेच आमचे शस्त्र होऊन 'सदैव सैनिक पुढेच जायचे.' गात गात संघर्ष करीत करीत वाटचाल करीत आहोत. 'सत्यासाठी आग्रह' हीच आमची सत्याग्रहामागची भूमिका, म्हणून सानेगुरुजींनी मंदिरप्रवेशासाठी पंढरपूरला 'सत्याग्रह', उपोषण केले. साने गुरुजी सेवादलाचे सैनिक असून सेवादल हा माझा प्राण आहे. असे मानणाऱ्या सानेगुरुजींच्या या छोटया सैनिकांना सत्याग्रहाची भूमिका सांगणे म्हणजे आपणच काय ते समजदार आहोत असे समजून स्वतःच्या बुद्धीचे दिवाळे काढणे आहे.

कोणा तरी एखाद्या सेवादलसैनिकाने म्हटलेही असेल की 'मला युवक कॉंग्रेसचा सेक्रेटरी करतायेत. चान्स कशाला सोडायचा' हे नाकारताही येत नाही; परंतु याचा अर्थ असा नव्हे की, सारेच सेवादलसैनिकांचे मत असे असते. तो म्हणतो याचा अर्थ असा को त्याला व्यक्तिगत मत आहे, त्याला आपले विचार प्रगट करण्याचे स्वातंत्र्य आहे. आणि आम्ही सेवादलात स्वतंत्रपणे विचार करायला शिकवितो. तेव्हा स्वतंत्रपणे तो आपला विचार व्यक्त करू शकतो. कारण संघवाल्यांसारखे आम्ही आपले विचार बाजूला ठेवून 'झापडी बांधलेल्या घाण्याच्या बैलासारखे अंधानुकरण करत नाही.' आम्ही असं मानतो की, लोकशाहीप्रक्रियेत स्वतःची मते असली पाहिजेत आणि ती स्पष्टपणे मांडता आली पाहिजेत; परंतु संघात असं नाही. याचे एक चांगले उदाहरण देता येईल की, परवाच मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षकांच्या सिनेट निवडणुका झाल्या. आम्ही एका प्राध्यापकसाहेबांकडे गेलो. अर्थातच हे प्राध्यापक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेच. तर ते आम्हाला सांगतात की, आम्ही आमचे बॅलेट पेपर्स संघकार्यालयाकडे पाठविले आहेत. तेव्हा कार्यालय कोणाला मते द्यावयाची ते ठरवील! हे प्राध्यापक लोकशाहीचे पाईक!

युवक कांग्रेसचा सेक्रेटरी होणारा सेवादल सैनिक तुमच्या मते संधिसाधू असेल तर आणीबाणीच्या काळात संजय-सेनेत भरती होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांना काय म्हणावयाचे? श्रीमान गुणे यांचे दुसरे एक विधान असे की, संघाचे हजारो कार्यकर्ते, 'लोकसंघर्ष समितीच्या' सत्याग्रहात सामील झाले. हे वरवर पहाता खरे असले तरी संघर्षवाहिनीच्या व्यासपीठावर जेव्हा चातुर्वर्ण्यावर हल्ले चढवावयास सुरुवात केली तेव्हा मात्र प्रत्येक ठिकाणी यांनीच काढता पाय घेतला. फक्त निधी जमा करण्यासाठी आणि विविध पदाधिकारी होण्यासाठी ही मंडळी पुढे होती, हे नाकारता येत नाही आणि संघर्षाच्या वेळी तिचे हट्ट.. एवढंच काय जेव्हा जे. पी. नी जाती तोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून जानवे तोडो चा आदेश दिला. या मंडळींचा युक्तिवाद असा की, जानवे तोडण्यापेक्षा प्रत्येकाने जानवे का घालू नये? ह्या यांचा पूर्वगामीपणा. विनय गुणे जेव्हा लिहितात की, आदिवासी, गिरिजन भागात संघाच्या शाखा सुरू आहेत. संघाच्या शाखा चालविणे म्हणजे समाजसेवेचे किंवा समाजपरिवर्तनाचे प्रतीक नव्हे. आदिवासी किंवा गिरिजन भागात यांचा कार्यक्रम काय तर गुरुदक्षिणा, रक्षाबंधन, दसऱ्याचे संचलन आणि सर्वांत पुरोगामी कार्यक्रम म्हणजे 'सहभोजन!' या सहभोजनात कोण सामील? तर पांढरपेशातील प्रतिष्ठितांची गोरीगोमटी मुलं आणि मुली. जेवणात काय तर अंब्याचं लोणचं, कोशिबीर, पोळ्या, तक्र, लिंबाचं लोणचं आणि जामून. मग तेथे हैब्रिडची रोटी नको किंवा 'घट्ट पिटल आणि रट्ट रोटी नको!'

श्रीमान गुणे सांगतात की हजारो संघकार्यकर्ते लोकसंघर्षसमितीत असतात. तर मग 'एक गाव एक पाणवठा' या कार्यक्रमास इतका ठाप्पपणा कशासाठी? वरून वरून पुरोगामीपणा आणि आतून प्रतिगामीपणा. या गिरिजन भागात या संघवाल्यांनी कधी श्रमशिबीर किंवा मेळावे आयोजित केलेत? फक्त मूठभर प्रस्थापितातली चार मुलं एकत्र जमविली म्हणजे झाली शाखा आणि तेथे शिक्षण काय तर सर्व कर्मकांड! शाखेवर म्हणे सर्व धर्मांना प्रवेश! हिंदूंनी आपली प्रार्थना म्हणावी, मुसलमानांनी नमाज पढावा कोठे? तर शाखेवर. म्हणजे एकूण कर्मकांडच की!

श्रीमाने गुणे यांच्या मते संघ सर्वव्यापी होऊन सर्व समाज संघमय होणार. महाशय, समाज एकसंघ केव्हा होऊ शकेल तर जोपर्यंत आम्ही श्रेष्ठ, कनिष्ठ किंवा चातुवर्ण्याच्या भिंती कोसळून देऊन भावनात्मक एकता जोपर्यंत स्थापित होत नाही तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता स्थापित होत नाही! यासाठी साने गुरुजींचे 'आंतर भारती' हे स्वप्न साकार झाले पाहिजे आणि हे करण्यासाठी संघ नव्हे तर सेवा-दल हाच पर्याय होय. म्हणून साने गुरुजी म्हणतात की, सेवादल हा माझा प्राण आहे!

जनता पक्ष सत्तेवर आला आणि संघवाल्यांना वाटायला लागले की, आपल्या काळ्या टोप्या 'सर्टिफाईड' झाल्या आणि म्हणून आणीबाणीत धूळ खात पडलेल्या काळ्या टोप्या भट्टीला देऊन किंवा ड्रायक्लीनिंग करून डोक्यावर चढविल्या आणि म्हणून लागलीच पुण्यात जनता मारुतीची स्थापना. जनता पक्षाच्या विजयाने यांची मिरासदारी खूप वाढली याचे उदाहरण म्हणजे गतवर्षी उदगीर तालुक्यात देवणी येथे जनता पक्षाचा मेळावा झाला. तेव्हा या मेळाव्यात मार्गदर्शन करण्यासाठी महात्मा फुले प्रतिष्ठानचे व सत्य शोधक चळवळीचे नेते डॉ. बाबा आढाव एक गाव एक पाणवठा व विषमतानिर्मूलन या विषयावर बोलण्यासाठी आले. तर हे तथाकथित जनतावाले म्हणवून घेणारे स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते रागाने लाल झाले! असे का? तर बाबा आढावांनी 'संघाची ढोंगबाजी' लिहून त्यांचा पर्दा पॉश केला होता. त्यांना आजही वाटायला लागले की आर. एस्. एस्. चे जनसंघावर प्राबल्य होते तें आपले जनता पक्षावरही असावे; पण हे चालणार नाही हे त्यांना दाखवून दिले.

एका बाजूला लिहितात की, आम्ही अर्थात पूर्वाश्रमीचे संघवाले आणि आर. एस्. एस. वाले की, आम्ही मुसलमानांचा द्वेष करीत नाही. आम्ही सर्व धर्मीयांना समान मानतो; परंतु बोलण्यात असे असले तरी कृतीत मात्र वेगळेच. परवाचीच गोष्ट. महाराष्ट्रात जनता पक्षाचा नेता निवडताना आमदार निहाल अहमद यांना किती नि कोणती मते मिळाली? तर फक्त पूर्वाश्रमीचे जे समाजवादी होते त्यांचीच! या वेळी यांची मानवतावादी सर्वेक्षण दृष्टी कोठे गेली होती?

याही वेळी संघवादच उफाळून आला ना? □

रंगभूमी । विनया खडपेकर

# सूर्याची पिल्ले

'सूर्याची पिल्ले' हा श्री. वसंत कानेटकर यांनी लिहिलेला आणि श्री. दामू केंकरे यांनी दिग्दर्शित केलेला तीन अंकी फार्स आहे.

आपल्या संपादकीय लेखांनी ब्रिटिशांना हादरविणारे, तत्त्वासाठी आमरण उपोषण करणारे, राष्ट्रासाठी अंदमानात हालअपेष्टा भोगणारे एक थोर देशभक्त श्री. कोटिभास्कर यांच्या मृत्यूनंतर त्यांची निरनिराळी कार्ये, त्यांची मुले (त्या सूर्याची पिल्ले) आपापल्या कुवतीनुसार ओढतात. त्यांच्यात पित्याचे तेज नाही, परंतु ते असल्याचा वृथा अभिमान मात्र आहे. त्यामुळे ती भोवतालच्या लोकांत हास्यस्पद ठरतात. धड सर्वसामान्य माणसाचे साधेसुधे जीवन नाही, धड पित्याचे कार्य गतिमान ठेवण्याची ताकद नाही अशी त्यांची स्थिती आहे. आपण 'ते तेजस्वी' कोटिभास्कर नव्हे तर केवळ त्यांची मुले आहोत. आपल्यात त्यांचा वकूब नाही, आपण आपल्या चालीने चालावे हे त्यांना शेवटी उमगते हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

हा विषय तीन अंकी फार्समधून सादर केला आहे. नाटकातील काळ श्री. कोटिभास्कर यांच्या मृत्यूला पंचवीस वर्षे होऊन गेल्यानंतरचा आहे. श्री. कोटिभास्करांच्या वाड्यातच सर्व कथानक घडते. लोक आता देशभक्त कोटिभास्करांना विसरले आहेत. त्यांच्या भल्यामोठ्या वाड्यात त्यांची मुले राहतात. मोठा पांडुअण्णा हा 'रणगर्जना'चा संपादक, त्याची पत्नी निधन पावली आहे. दुसरा बजरंग- तो कोटिभास्करांनी सुरू केलेल्या शाळेचा संचालक, मुख्याध्यापक वगैरे आहे. त्याची पत्नी युगंधरा. तिसरा रघुराया. तो डॉक्टर आहे. देशभक्त कोटिभास्करांनी काढलेल्या आरोग्यधामाचे काम तो पहातो. त्याने आजन्म ब्रह्मचारी राहण्याचे व्रत घेतले आहे. आपण कोटिभास्करांचा वारसा चालवितो असा यांना- विशेषतः मोठ्या दोघांना- अभिमान आहे. चवथा श्रीरंग. त्याच्याकडे मात्र पित्याचा कोणताच वारसा नाही. तो नसत्या उचापती करणारा असे मोठ्या दोघांना वाटते. नाटक सुरू होते तो दिवस देशभक्त स्व. कोटिभास्करांच्या पुण्यतिथीचा आहे. पुण्यतिथीला प्रयत्न करूनही लोक जमत नाहीत. प्रमुख पाहुणे जांबुवंतराव आणि त्यांची कन्याही वेळेवर येऊ शकत नाहीत. कार्यक्रम यथातथा उरकला जातो. जांबुवंतराव कन्येसह उशीरा येतात. ते मुक्कामच ठोकतात. स्व. कोटिभास्करांचे मित्र आणि त्यांनी नेमलेले एकमेव विश्वस्त म्हणून सर्व सूत्रे स्वतःच्या हातात घेतात. कोटिभास्करांचा मृतात्मा माझ्याशी रात्री येऊन बोलतो. त्याच्या सांगण्याप्रमाणे मी सर्व बदल घडवून आणतो असे म्हणून 'रणगर्जना' बंद करण्याचा आदेश देतात. आरोग्यधाम बंद करून त्याऐवजी 'मंगल कार्यालय' सुरू करण्याचे योजतात. शाळा चिपळूणकर सोसायटीला द्यायचे ठरवितात. दरम्यान एकीकडे पांडुअण्णा-बनुताई आणि दुसरीकडे रघुराया-कन्यारत्न ही प्रेमप्रकरणे आपली वाटचाल करीत असतात. शेवटी मृतात्मा वगैरे काही खरे नाही, सगळ्यांना मार्गावर आणण्यासाठी श्रीरंगानेच हा डाव रचला होता हे कळते. पांडुअण्णा-बनुताई विवाह होतो. रघुराया-कन्यारत्न विवाह होतो. 'माझ्याकडे आला आहे कोटिभास्करांचा असंतोष' असे म्हणून श्रीरंग निघून जाण्याचे ठरवितो. असे या नाटकाचे थोडक्यात कथानक.

या नाटकात एक गंभीर विषय हलक्याफुलक्या तऱ्हेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु तो पूर्णपणे फसला आहे. याला दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे गंभीर नाट्यविषय हलका-फुलका होताना मुख्य सूत्रापासून पार इकडेतिकडे गेला आहे. 'पांडुअण्णा-बनुताई,' 'रघुराया-कन्यारत्न' या प्रेमकरणांची मुख्य विषयाच्या दृष्टीने आवश्यकताच वाटत नाही. ही प्रकरणे अगदी थोडक्यात आटपली असती तर मुख्य विषयाचा परिपोष करू शकली असती. दुसरे म्हणजे नाटकाची प्रकृती फार्सची आहे. त्यात सूक्ष्म मनोविश्लेषणाला अवसर नाही. व्यक्तींच्या स्वभावचित्रांनाही फारसे महत्त्व

नाही. गतिमान घटनांच्या ओघात जे काही सांगायचे आहे. ते सहजपणे सांगितले गेले पाहिजे; परंतु येथे 'कन्यारत्ना'चा मनोबदल दाखविण्यात आणि बजरंगाचा स्वभाव उलगडून दाखविण्यात बराच वेळ गेला आहे. त्यामुळे फार्सची गती अधेमधेच संथ होऊन एकंदर नाटकाचा तोल बिघडतो. फार्स असल्यामुळे सखोल मनोविश्लेषणाचे समाधानही लाभू शकत नाही. जेमतेम एक फार तर दोन अंकांचे नाटक उगीचच तीन अंकांपर्यन्त ताणल्यासारखे वाटते.

हे नाटक बघताना काही इतर नाटकं-चित्रपटातली पात्रं आठवतात. 'पांडुअण्णा बनुताई' हे प्रेमिक थेट 'भटाला दिली ओसरी' मधल्या वयस्क प्रेमिकांची आठवण करून देतात. रघुराया पाहून अत्र्यांच्या 'ब्रँडीची बाटली'मधील बगाराम, पुलंचा 'शाम' 'करायला गेलो एक'मधील हर्षे यांची आठवण होते. 'कन्यारत्न' पु. ल. देशपांड्यांच्या 'पुढारी पाहिजे'मधील सर्वोदयी कार्यकर्तीच्या परंपरेतील वाटते. सगळ्या घराची घडी नीट बसल्यावर 'निघून जातो' म्हणणारा श्रीरंगा 'पेडगावचे शहाणे'मधला काका किंवा हिंदी 'बवर्ची'-कडून ट्रेनिंग घेऊन आल्यासारखा वाटतो.

नाटकाचा प्रयोग टापटिपीने बसविला आहे. सर्वच कलाकार आपापल्या भूमिकेसाठी योग्य वाटतात. सर्वांनी आपापली कामे समरसून केली आहेत. अभिनयात कोणी डावे-उजवे म्हणता येणार नाही. आडमुठा बजरंग, बुळगट असलेला पण अचानक धीट झालेला रघुराया, दोन प्रेमप्रकरणे, काही मार्मिक विडंबनात्मक वाक्ये ( उदा : आबाकाकांनी मरताना हे राष्ट्र तुमच्या ओटीत घातले. ) यामुळे नाटक चालू असताना प्रेक्षागृहात सतत हास्याच्या प्रचंड लाटा उठत असतात.

लेखनात फसलेला परंतु प्रयोगात तरलेला असा हा फार्स वाटतो. □

---


# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

आणीबाणीचं आसुरी आव्हान ओळखणारं,
त्या आव्हानानं अस्वस्थ होऊन पेटून उठणारं आणि
विकासशील वैचारिक निष्ठेनं या जुलमाला
प्रकटपणे हटकणारं......विनयचं
संवेदनाक्षम, चिकित्सक, रसरशीत मन....

या मनाची
अन् या मनात पडलेल्या असंख्य, अथांग प्रतिबिंबांची
ही मार्मिक आणि मर्मभेदक कहाणी....

या लेखनाला कादंबरी म्हणावं की आत्मकथन ?
की आपलं कहाणीच ?
म्हणावं काहीही, एक खरं...
प्रांजळ मनानं वाचणाऱ्याला ही कहाणी मनोमन बोलकं करील,
अंतर्मुख करील, प्रत्येकापुढे निर्लेप आरसा धरील—
जबाबदारीनं, सहानुभूतीनं....आणि
आपुलकीच्या कडव्या उत्कटतेनं.

दुर्मिळ असे अस्सल बावनकशी क्षण विनय जगला.
ते वाया गेले नाहीत.
या कहाणीत त्या क्षणांना तितकंच अस्सल,
तितकंच बावनकशी रूप लाभलं आहे.

—प्रा. स. शि. भावे

**लवकरच प्रसिद्धी**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# The Day Of The Jackal

## गुंगवून टाकणारा पाठशिवणीचा खेळ

सदानंद बोरसे

The Day of The Jackal या फ्रेड्रिक फॉरसिथच्या अत्यंत गाजलेल्या कादंबरीवरून दिग्दर्शक फ्रेड झिनमन यांनी बेतलेला त्याच नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला.

फ्रान्सचा अध्यक्ष (ऊर्फ हुकूमशहा) चार्लस द गॉल यांच्या खुनाचा एक अत्यंत रेखीव पण असफल प्रयत्न. तो प्रयत्न करणारा खुनी म्हणजे Jackal. असा हा चित्रपटाचा आणि कादंबरीचा विषय. हा खुनाचा प्रयत्न शेवटी असफल होतो, हा चित्रपटाचा शेवट हे उघड गुपित असल्याने शेवटी धक्कादायक रहस्यभेद वगैरे काही होत नाही आणि ते या रहस्यपटाचे वैशिष्ट्य नाहीच. संपूर्ण चित्रपटभर धागा जुळवून जुळवून जाळे विणत जाणारा जॅकाल आणि त्या एकेका धाग्याचा एखादा तंतू हाताशी आला तरी तो धरून जॅकालच्या दिशेने पावले टाकणारी फ्रेंच गुप्तचरव्यवस्था या दोघांचा चाललेला पाठशिवणीचा खेळ डोके गुंगविणारा आहे. प्रत्येक वेळी पाठलाग काही पावलांवर असताना जॅकालला त्याची जाणीव होई; तर प्रत्येक ठिकाणी फक्त एक आणि एकच पाऊल पुढे असल्याने जॅकाल निसटून जाई. कोणत्याही ठिकाणी स्वतःचा थांगपत्ताही राहू न देता पुढे जाणारा जॅकाल अधिक कसबी की कोणताही पुरावा हाताशी नसताना त्याचा माग काढणाऱ्या पोलिसांचे अधिक कौशल्य? दोघांच्याही बाबतीत योगायोग आहेत, स्वतःचे प्रयत्न आहेत, इतरांची मदत आहे आणि शेवटच्या घडीला एकाचे सुदैव आणि अटळपणे तेच दुसऱ्याचे दुर्दैवही आहे.

सुरुवातीला मी फ्रेड झिनमन यांनी 'बेतलेला' चित्रपट म्हटले, ते कादंबरीच्या मानाने असलेल्या चित्रपटाच्या आवाक्याच्या संदर्भात. कादंबरीचा आवाका अतिशय मोठा आहे. लेखकाने कादंबरीचे तीन विभाग केले आहेत, Anatomy of a plot, Anatomy of a manhunt आणि Anatomy of a Kill. यातील Anatomy हा शब्दप्रयोग सार्थ करणारी ही कादंबरी आहे. एखादी वस्तू ही हळूहळू dissect करीत वा तिचा धागान्धागा उलगडीत जावे, अगदी तशा पद्धतीने लेखकाने जॅकालच्या प्रयत्नाआधीची पार्श्वभूमी, परिस्थिती, जॅकालने केलेली तयारी, त्याचा लागत गेलेला शोध आणि त्याचा प्रयत्न या गोष्टी अत्यंत चित्रमय वर्णनाने डोळ्यांपुढे उभ्या केल्या आहेत. एखाद्या घटनेच्या वा व्यक्तीच्या मुळापर्यन्त जाण्यासाठी तिच्या भूतकाळातील अनेक संदर्भघटना सांगितल्याने तो प्रसंग किंवा ती व्यक्ती झटकन वाचकाच्या डोळ्यांपुढे आकार घेते, संपूर्ण रहस्यकथेच्या साखळीतील बारीक–सारीक दुवेही अत्यंत बारकाईने नजरेसमोर उभे राहतात; त्यामुळे कादंबरी ही अतिशय प्रवाही बनली आहे; पण हा प्रवाह कुठेही वेग न बदलता एका संतत गतीने वाहात राहतो. चित्रपटमाध्यमात या साऱ्यालाच मर्यादा पडल्या. मुख्य मर्यादा वेळेची; त्यामुळे असेल कदाचित; पण चित्रपटात जॅकालची खुनी म्हणून नियुक्ती होण्यापूर्वीची पार्श्वभूमी व परिस्थिती यांचा छोट्या निवेदनातून ओझरता आढावा आणि सुरुवातीचा द गॉलच्या खुनाच्या अनेक फसलेल्या प्रयत्नांच्या प्रसंगांपैकी एक प्रसंग एवढे वगळल्यास संपूर्ण चित्रपटाचा भर जॅकाल आणि पोलिसांच्या पाठशिवणीवरच आहे. त्यामुळे चित्रपटाचा प्रवाहही अतिशय वेगवान बनत असला तरी तो भराभर एका धारेतून दुसऱ्या बदलत्या धारेत प्रेक्षकाला फेकीत असतो.

शिवाय कादंबरीमध्ये एखाद्या व्यक्तीचे केलेले वर्णन वाचून जितके समर्पक चित्र कल्पनेने आपण बांधू शकतो, तितके चांगले चित्र चित्रपटातून डोळ्यांपुढे येईल वा ते आपल्याला रुचेलच असे नाही. उदाहरणार्थ– The irises which were of flecked grey so that they seemed smoky like the hoar mist on a winter's morning–whatever thoughts did go on behind the smoke-screen, nothing came through हे जॅकालच्या डोळ्यांचे वर्णन वाचल्यानंतर आपल्यापुढे उभे राहणारे गहिरे, धुकाळ डोळे–एखाद्या धूरभरल्या गुहेसारखे खोल, अगम्य आणि अस्वस्थ करणारे–चित्रपटमाध्यमातून दाखविणे म्हणजे त्या माध्यमाची सत्त्वपरीक्षाच! साहजिकच द गॉलच्या लांब नाकापासून जॅकालच्या रापलेल्या गोऱ्या रंगापर्यंत केलेल्या शारीरिक वर्णनातून आणि प्रत्येक प्रसंगातील व्यक्तींच्या मानसिक अवस्थांच्या वर्णनातून लहानसहान व्यक्तिरेखाही जितक्या ठसठशीतपणे कादंबरीमधून डोळ्यांपुढे उभ्या राहतात, तितक्या चित्रपटातून त्या राहत नाहीत. (अपवाद फक्त जॅकाल आणि कमिशनर लॉइडचा.) अर्थात संपूर्ण चित्रपटात अशा व्यक्तिचित्रणाला कोठेच महत्त्व दिलेलेही नाही आणि म्हणूनच कादंबरीतील अतिशय ठळक घटना घेऊन, बारीक घटना अतिशय थोडक्यात आटोपून वा अजिबात गाळून आणि घेतलेल्या घटना भराभर एकापुढे एक मांडून दिग्दर्शकाने अत्यंत

वेगवान चित्रपट तयार केला आहे. पटकथेसाठी निवडलेल्या घटना अत्यंत ठळक आणि आवश्यक असल्याने मी प्रारंभी चित्रपट घेतला आहे, असे म्हटले.

या घेतलेल्या घटना अतिशय तपशिलाने घेतल्या असल्या, तरी त्यांच्या वेगामुळे, आधीचे काही संदर्भ नीट न लागल्यामुळे असे छोटे छोटे दुवे लक्षात न येण्याची शक्यता आहे. विशेषतः खुनाची पूर्वतयारी चालू असताना जॅकालने आपले साहित्य जमविण्यासाठी केलेल्या युक्त्या काही वेळा अतिशय डोक्यावरून जातात वा अधिक लक्ष वेधून न घेता निसटतात.

चित्रपटमाध्यमाच्या मर्यादा लक्षात घेता कादंबरीच्या तुलनेत या उणीवा राहणे स्वाभाविकच आहे.

दृश्य परिणाम हे चित्रपटमाध्यमाचे एक प्रभावी सामर्थ्य. त्याचा उपयोग शक्य तितका जास्त करून घेतला आहे. बहुतेक ठिकाणी या दृश्य परिणामात एक वास्तवता आणि म्हणूनच सजीवता आहे. उदाहरणार्थ– चित्रपटात होणारे निरनिराळ्या व्यक्तींचे खून. जॅकाल झालेल्या एडवर्ड फॉक्सने खऱ्या व भूमिकेच्या नावाला साजेशी कोल्ह्याची धूर्तता, कोणत्याही खुनाच्या वेळचा Professional सराईत थंडपणा, संपूर्ण योजनेतील प्रसंगावधान सुरेख सादर केले. कमिशनर लॉइडचे काम केलेल्या अभिनेत्यानेही अतिशय सावध बेसावधपणा, जॅकालच्या पाठलागासाठी घेतलेले कष्ट, धडाडी इत्यादी बाजू नीट उभ्या केल्या. या दोघांनीही अभिनयाची–दृश्य–बाजू उत्तम पेलली.

चित्रपटात प्रसंगातील वास्तव आवाज कमी-जास्त intensity ने वापरले आणि काही ठिकाणी ते प्रभावीही ठरले. उदाहरणार्थ–मादाम ला बॅरनच्या खुनाच्या वेळची रात्रीची भयाण निःशब्दता, डॅनिश माणसाच्या खुनाच्या वेळी वाढलेला टी. व्ही. चा आवाज.

मूळ कादंबरी न वाचता चित्रपट पाहिला, तर तो चांगलीच पकड घेतो; पण कादंबरीपुढे चांगलाच फिका वाटतो. चित्रपट पाहून पोट भरल्याचे समाधान मिळत असले, तर कादंबरीमधून चवीचवीने खाऊन पोट भरल्यासारखे वाटते. □

---


## NEW TITLES RECEIVED

| | | |
|---|---|---|
| 1. | **All the Janata Men** – ( Politics ) – Janardan Thakur | Rs. 30–00 |
| 2. | **In the shadow of Man** – ( A painstaking study of the Chimps ) – Jane Van Lawick-Goodall | Rs. 49–80 |
| 3. | **Mandala** – ( A unique blend of political insights and philosophical reflection ) – Apa Pant | Rs. 45–00 |
| 4. | **One flew over the Cuckoo 's Nest** ( Bestseller – Novel about mental institution ) – ( Picture Story ) – Ken Kesey | Rs. 13–30 |
| 5. | **Philby** – ( Biography of the famous spy Kim Philby ) – Introduction by John Le Carre | Rs. 00–95 |
| 6. | **Touch not the Cat** – ( Bestseller Novel ) – Mary Stewart | Rs. 15–75 |
| 7. | **Close encounters of the third kind** – ( Science fiction – Actual contact between men & UFO occupants ) – Steven Spielberg | Rs. 00–85 |
| 8. | **Shambhala** – Oasis of Light – ( Cosmology – A mysterious kingdom exists below the Himalayas ) Andrew Tomas | Rs. 14–10 |
| १. | गुलमोहोर – ( पाश्चिमात्य साहित्यिक आणि त्यांच्या कलाकृतींचा परिचय करून देणारे लेख ) – शंकर सारडा | रु. २०–०० |
| २. | विनोदाचा अमरकोश – रमेश मंत्री | रु. १२–०० |
| ३. | हिटलरचे महायुद्ध – ( दुसऱ्या महायुद्धाचा चित्रमय इतिहास ) वि. ग. कानिटकर | रु. १५–०० |

● आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ऱ्यांइतक्याच वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचा.

**THE PHOENIX LIBRARY**

727, Opp. Sadashiv Post, Pune–411 030

## अनेकांचे धन येथे, एके ठायी आले
## अनेकांच्या सेवेसाठी, येथे आतुर थांबले

आपल्यापैकीच काहींनी बचत केली, करत आहेत आणि करतीलही. तोच पैसा संचित झाला आहे आणि योग्य तो विनियोग व्हावा यासाठी, खरं तर हा पैसा देखील आतुर आहे. 'विलोपले मधु मीलनात या' म्हणणाऱ्या नवयुवतीप्रमाणे —

स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपण त्याचा उपयोग करून घ्यावा हीच अपेक्षा आहे. तुम्ही कॉलेजच्या बाहेर पडलेले उमेदीचे पदवीधर असा, किंवा विणकामाचा व्यवसाय सुरू करण्यास उत्सुक असा, वाकबगार चर्मकार असा.... तुमच्या उमेदीला पैशांची साथ द्यावयाला आम्ही आतुर आहोत.

# बँक ऑफ महाराष्ट्र
**( भारत सरकारचा उपक्रम )**

**मुख्य कचेरी : ११७७, बुधवार पेठ,**
**पुणे ४११ ००२**